www.yuvakadhar.in

E mail - dainikyuvakaadhar@gmail.com

facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

मुख्य संपादक - भारती संतोष आमले उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 304 शुक्रवार दि. १8 जुलै २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514




## “राज्यात पाच महिन्यात १ लाख ६० हजार गुन्हे, ९२४ हत्या”, अंबादास दानवे यांनी मांडली धक्कादायक आकडेवारी ?

मुंबई – राज्यात गुन्हेगारी, भ्रष्टाचार शिखरावर पोहोचला असून कायदा सुव्यवस्था ढासळली आहे, अशा शब्दात विधान परिषद विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी महायुती सरकारच्या कारभारावर टीकेचे आसूड ओढले. स्पर्धक कंपनीपेक्षा ३ हजारांहून अधिक कोटींची बोली बोलल्यानंतरही मेघा इंजिनिअरिंग कंपनीला ठाणे बोरिवली बोगद्याचे काम देणे, शालार्थ आयडी घोटाळ्यावर पांघरूण घालणे यावरून सरकारला खडे बोल सुनावतानाच शेतकरी आत्महत्यांसह अनेक प्रश्नांवरून दानवे यांनी सरकारवर जोरदार टीका केली. मागील पाच महिन्यात १ लाख ६० हजार गुन्हे राज्यात घडले. ९२४ हत्या झाल्या असून दररोज ६ हत्या होतात. तर ३ हजार ५०६ बलात्कार झाले. या घटनांमध्ये जवळचे लोकं एवढे हिंमत का करतात? असा संतप्त सवाल दानवे यांनी उपस्थित केला. मुख्यमंत्री यांच्या नागपूर जिल्ह्यात १० हजार ४०० गुन्ह्यांची नोंद झाली आहे. पुणे संभाजीनगर, नाशिक येथे अनेक मोठे गुन्हे दाखल झाले आहेत. गुन्हेगारीत महाराष्ट्र १० क्रमांकावर आहे. पुण्यात मोठ्या प्रमाणावर टोळ्या सक्रीय असून भाईगिरी सुरू आहे, असा



दावाही त्यांनी केला. अनेक विभागात भ्रष्टचार वाढला आहे.. प्रचारात स्वच्छ प्रशासन म्हणतात मात्र दररोज घोटाळे बाहेर येतात.. सत्ताधारी मंत्री भ्रष्टाचार करत असताना काय करणार असा प्रश्न उपस्थित केला.. महायुती सरकार सत्तेत आल्यापासून राज्यात कायदा सुव्यवस्था राखण्यास सरकारला अपयश आल्याचा आरोप विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला. तसेच सरकारमधील मंत्र्यांचे समोर आलेल्या विविध घोटाळ्यांबाबत दानवे यांनी सरकारवर जोरदार टीका केली. सरकारच्या विविध खात्यात भ्रष्टाचार बोकाळलेला असून मंत्री कमिशन शिवाय कोणतं काम करत नसल्याचा गंभीर आरोपही दानवे यांनी केला. राज्यात शेतकऱ्यांचे हाल सुरू असून महिला भगिनींवर अन्याय आत्याचाराच्या घटना घडत असताना याबद्दल सरकारने मौन धारण केले असून फक्त कंत्राट मिळवण्यात त्यांना रस असल्याची टीका दानवे यांनी केली. सत्ताधारी पक्षातील लोकं अनेक गुन्ह्यात सहभागी असून महिला अत्याचारातही सत्ताधारी पुढे आहेत. राज्यात गुत्तेदार आणि दरोडेखोर यांचे राज्य आले असून कोणत्याच गुन्हेगारांवर कारवाई होत नसून कायद्याचे पालन होत नसल्याबाबत दानवे यांनी गृह खात्यावर ताशेरे ओढले.

## दृष्य सत्य

### जनतेच्या नजरेतून शासनाच्या दरबारात

### बस स्थानक ते होळकर चौकापर्यंत रस्त्याची अत्यंत बिकट अवस्था तसेच घाणीचे साम्राज्य

**सत्यदृश्य नागरिकांचीहाक स्वच्छतेचा सवाल**





**फोटोतून शासनदरबारी आवाज पोहोचवत आहेत**

**दैनिक व आधारचे लातूर प्रतिनिधी मोहम्मद पिंजारी**

" मुरुड शहराच्या बस स्थानक ते होळकर चौकापर्यंत रस्ता पूर्ण उखडलेला असून मोठ मोठे खड्डे पडलेले आहेत त्यामुळे पाणी साचून घान मोठ्या प्रमाणात होत आहे तसेच तलावाच्या बाजूने मोठ्या प्रमाणात घानीचे साम्राज्य पसरले आहे तसेच दुर्गंधी ही पसरलेली आहे त्या मुळे डुकरांचा वावर वाढलेला आहे मात्र ग्रामपंचायतचे दूर लक्ष हा चिखल नव्हे, तर नागरिकांच्या आरोग्यावरचा गंभीर आघात आहे! डास, दुर्गंधी आणि संसर्गजन्य रोगांच्या छायेत जगणारे नागरिक प्रशासनाकडून केवळ ‘बघ्याची भूमिका’ अनुभवत आहेत."

**प्रशासन जागे होईल तेव्हा होईल... पण तोपर्यंत ही सत्य दृश्यं शासनाच्या दरबारात पोहोचवणे हीच आमची जबाबदारी.**

## पनवेल-उरण पाणीटंचाईवर आ. प्रशांत ठाकूर यांचा आक्रमक पवित्रा

### ऑटोमायझेशनसाठी दोन महिन्यांत निविदा जाहीर करण्याचे मंत्री उदय सामंत यांचे आश्वासन

### आमदार प्रशांत ठाकूर यांची सिडकोच्या कारभावर तीव्र आणि आक्रमक भावना

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

पाणी पुरवठा व वितरणासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत सिडकोच्या कारभावर तीव्र नाराजी आणि आक्रमकपणे भावना व्यक्त केल्यानंतर येत्या दोन महिन्यात पाणी वितरणासाठी ऑटोमायझेशनसाठी (स्वयंचलित यंत्रणा) निविदा जाहीर करण्याचे आश्वासन मंत्री उदय सामंत यांनी दिले असून या निर्देशानुसार कार्यवाही न केल्यास सिडकोच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आश्वासन सभागृहात दिले. सिडकोच्या माध्यमातून नवी मुंबईमधील पनवेल आणि उरण तालुक्यातील पाणीसंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचना उपस्थित केली. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्षवेधी सूचना मांडताना नागिरकांच्या भावना आक्रमकपणे प्रकट केल्या तसेच सिडको अधिकाऱ्यांच्या कारभारावर संताप व्यक्त करत ताशेरे ओढले. लक्षवेधी सूचनेवर लेखी उत्तरात मोघम उत्तर देण्यात आले होते, त्यामुळे त्याचा उल्लेख करत आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात बोलताना म्हंटले कि, न्हावाशेवा टप्पा ३, बाळगंगा, हेटवणे, मोरबे या सगळ्या धरणांचा इतिहास जवळपास लेखी उत्तरात दिले आहे. त्यामुळे पुढे बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्षवेधी सूचनेत म्हंटले कि, बाळगंगा पासून सर्व प्रकल्प आता अर्धवट स्थितीत आहेत किंवा कामे चालू स्थितीत आहेत. आणि यामधून होणारा पाणी पुरवठ्याचा तुडवडा होत राहतो. पाण्याची पाईपलाईन सातत्याने गळत राहते आणि दोन- दोन तीन- तीन दिवस पाणी बंद केले जाते. खारघर, कामोठे, कळंबोली, पनवेल, उलवा नोड, करंजाडे, द्रोणागिरी या सर्व वसाहतीमध्ये तुडवडा असल्याने सिडकोच्या विरोधात

पान २ वर





श्री.प्रशांत रामशेठ ठाकूर

> विकासकामे असो किंवा नागरिकांना भेडसावणारे प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासन दरबारी मांडून नागरिकांना कायम न्याय मिळवून दिला आहे. वेळ पडल्यास त्यांनी लोकांसाठी आपल्या पदाचा विचार केला नाही. आज त्यांनी सभागृहात बोलताना सिडकोच्या कारभाराविषयी तीव्र संताप व्यक्त केला मात्र त्यासोबतच असाच प्रशासनाचा कारभार राहिला तर लोकप्रतिनिधींना राजिनामा दिल्याशिवाय पर्याय राहणार नाही अशी खंत व्यक्त केली. अभ्यासपूर्ण मांडणीत त्यांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांचा निष्क्रिय कारभाराचे वाभाडे काढले. त्यामुळे एक कर्तव्यदक्ष आणि लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागरिकांच्या वतीने मांडलेला आवाज सभागृह ठणकावून गेला. शासनाने त्यावर सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. येत्या दोन महिन्यांत ऑटोमायझेशन निविदा जाहीर होणार असल्याने पाण्याच्या प्रश्नाला वाचा फुटली असून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात घेतलेल्या आक्रमक भूमिकेचा नागरिकांतून कौतुक होत आभार व्यक्त केले जात आहे.

## गोवंश जनावरे भरलेली पिकअप जप्त ; पाच जणांवर गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

**पांढरकवडा :-** पोलीस पथक दि.१५ जुलै रोजी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर पेट्रोलिंग करीत असताना पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, हिंगणघाट येथून आदिलाबादकडे जात असलेल्या एका पिकअप वाहनामध्ये गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी नेली जात आहेत. या माहितीनुसार पोलिसांनी तत्काळ नाकाबंदी करत पांढरकवडा ते पाटणबोरी दरम्यान संबंधित वाहनाची शोधमोहीम राबवली.या मोहिमे दरम्यान एक अशोक लेलँड कंपनीची पांढऱ्या रंगाची एम.एच.३१ एफ.सी.८५९६ क्रमांकाची पिकअप आढळून आली. वाहन थांबवून पोलिसांनी तपासणी केली असता त्यामध्ये गोवंशीय जनावरे निर्दयपणे दाटीवाटीने कोंबलेली आढळून आली. जनावरांना अरूंद दोऱ्यांनी बांधण्यात आले होते आणि त्यांना हालचालीसाठी पुरेशी जागाही दिलेली नव्हती. त्यापैकी एक गाय मृतावस्थेत होती. वाहनात एकूण ११ गायी होत्या. अंदाजे किंमतीनुसार या गायींची एकूण किंमत ५५,००० इतकी आहे. त्याशिवाय घटनास्थळी पोलिसांनी व्हिवो मोबाईल (किंमत ४,०००/-) आणि अशोक लेलँड वाहन (किंमत ११ लाख) असा एकूण ११ लाख ५९ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. वाहन चालकाची चौकशी केली असता त्याने आपले नाव प्रणय निरंजन सगुने (१९), रा. नागपूर असे सांगितले. त्याने पोलीसांना दिलेल्या जबानीत सांगितले की, सदर गोवंशीय जनावरे महेश सूर्यभान लोंढे (३५), रा. नागपूर, शाहीद अफजलखान कुरेशी (३०), रा. हिंगणघाट, शक्ती शेषराव कनाके (३८), रा. पाटणबोरी, स्वप्नील कनाके (२५) रा. नागपूर यांच्या सांगण्यावरून आदिलाबादकडे नेत असल्याचे स्पष्ट केले. या घटने प्रकरणी पांढरकवडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी संबंधित वाहन व जनावरे ताब्यात घेतले असून तपास सुरू आहे.





**दैनिक युवक आधार पनवेल:** पॅक्टिल इलेक्ट्रॉनिक्स प्रायवेट लिमिटेड कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. स्वप्नील प्रदीप गुप्ते यांची जवाहर को-ऑप इंडस्ट्रियल इस्टेट, कामोठे, पनवेल यांच्या अध्यक्षपदी बहुमताने नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले. या विशेष प्रसंगी भाजपा ओबीसी मोर्चा सोशल मीडिया जिल्हा संयोजक तथा शहर संयोजक श्री. प्रसाद हनुमंते आणि सागर रोकडे यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. श्री. गुप्ते यांच्या नेतृत्वाखाली औद्योगिक इस्टेटच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास अनेकांनी व्यक्त केला आहे.




## पंढरपूरातील २१३ सफाई कामगारांना ६०० चौरस फुटांची घरे - उपमुख्यमंत्री अजित पवार

**दैनिक युवक आधार**
**मुंबई..प्रतिनिधी**

सुधारित पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरू असून त्यामध्ये पंढरपूर शहरातील सफाई कामगारांसाठी सदनिका बांधकामांचा समावेश आहे.या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह काही लोकप्रतिनिधींकडून सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार पंढरपूर शहरातील २१३ सफाई कामगारांना प्रत्येकी ६०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या सदनिका देण्यात येतील. त्यासाठी ५५ कोटी ६१ लाख रुपयांचा खर्च प्रस्तावित आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य हेमंत रासने यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना ते बोलत होते. पंढरपूर शहरातील सफाई कामगारांना घरे देण्याच्या प्रकल्पामध्ये एकूण १३ इमारती आणि २१३ रहिवासी युनिट आहेत. या १३ इमारतींपैकी १२ इमारती ४ मजली असून, एक इमारत ५ मजली आहे. त्यामध्ये रस्त्यालगत असलेल्या ७ इमारतींमध्ये २४ दुकानांचे गाळे आहेत. या सफाई कामगारांना लवकरात लवकर घरे देण्याच्या दृष्टीने आजच स्थानिक लोकप्रतिनिधी आणि सोलापूर जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करण्यात येईल आणि त्यांना योग्य ते निर्देश देण्यात येतील. या सफाई कामगारांच्या प्रलंबित घरांचा प्रश्न तातडीने निकाली काढण्यात येईल आणि त्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी माहितीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

# सामूहिक प्रयत्नांतून लम्पी त्वचा आजारावर नियंत्रण

## डॉ. संदिप शिंदे, पशुधन विकास अधिकारी,

दैनिक युवक आधार
बीड आष्टी प्रतिनिधी :- मारुती सत्रे लम्पी त्वचा आजार हा साथीचा आजार आहे. आजारामुळे पायावर सूज येऊन जनावर लंगडते, ताप येऊन गेल्यानंतर संपूर्ण शरीरावर त्वचेखाली २ ते ५ सेंमी आकाराच्या गाठी येतात. आजाराच्या नियंत्रणासाठी गोवर्गीय वासरे, गाई, बैल यांचे प्रतिबंधात्मक लसीकरण करावे. बाधित जनावरावर पशुवैद्यकांच्या सल्ल्यानेच उपचार करावा.

ल बपी त्वचा आजार हा देवी वर्गातील कॅप्रीपॉक्स प्रवर्गातील विषाणूमुळे पसरतो. हा साथीचा आजार आहे. हा आजार मुख्यत्वे गोवर्गीय जनावरांमध्ये दिसतो. म्हैस, शेळी-मेढ़ी व इतर प्राण्यामध्ये हा आजार दिसत नाही. आढळला नाही, विषाणूवाहक डास, माझ्या, गोचिड, चिलटे ई. कीटक तसेच बाधित जनावरांच्या संपर्कातील वस्तु, जखमा, नाकातील साव यामुळे आजाराचा प्रसार होतो.

**लक्षणे**

१०४ ते १०५ अंश फैरानहाइटपर्यंत ताप येती, पायावर सूज येऊन जनावर लंगडते, ताप येऊन गेल्यानंतर संपूर्ण शरीरावर त्वचेखाली २ ते ५ सेंमी आकाराच्या गाठी येतात.

गळा व मागील पायाजवळील लसिका ग्रंथी सुजतात, हालचाल तसेच भूक मंदावते, दूध उत्पादनात घट येऊन नाक व डोळ्यावाटे साव गळतो.

**उपचार**

आजाराची लक्षणे दाखवणारे जनावर दिसताच तत्काळ नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क करावा. जनावराचे वितगोकरण करून त्वरित उपचार सुरू करावेत.

**जनावरांचे व्यवस्थापन**

हा विषाणूजन्य आजार असल्याने खात्रीशीर उपचार उपलब्ध नाही. बाधित जनावरावर पशुवैद्यकांव्या सल्ल्यानेच उपचार करावा.

बाधित जनावरांचे निरोगी जनावरांपासून विलगीकरण करावे, विलगीकरणात ऊन, वारा, पाऊस यापासून त्यांचे संरक्षण करावे.

आजारी जनावरांची रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी समतोल आहार द्यावा. ज्यामध्ये हिरवी वैरण, पेंड, खनिज मिश्रणे, हर्बल लिव्हर टॉनिक, पचनक्रिया निरोगी ठेवण्यासाठी प्री आणि प्रो-जैविक औषधांचा समावेश करावा.

मान आणि फऱ्यावर सूज असल्यामुळे जो जनावरे वैरण खात नाहीत, त्यांना हाताने वैरण खाऊ घालावी.

तोंडावाटे औषधे पाजणे टाळावे. औषधे पाण्यामध्ये मिसळून द्यावे किंवा मरड्यामध्ये औषध कालवून त्याचे गोळे/लाडू करून जनावरांस खाऊ मालावेत.

जनावरांची प्रतिकार शक्ती वाढवणे साठी LSD FMD BOOSTER POWDER 60GM रोज लाडू करून चरावे तसेच LIVET PLUS लिव्हर टॉनिक 50मिली रोज द्यावे.



काही बाधित जनावरे पायावरील सुजेमुळे बसत नाहीत. अशा जनावरांना चटका बसणार नाही अशा मीठ घातलेल्या गरम पाण्याचा (हे मिश्रण तयार करताना मीठ गरम पाण्यामध्ये जोपर्यंत विरघळत राहते तोपर्यंत टाकावे) शेक कापडाने सुजेवर द्यावा. दिवसातून असे दोन वेळा सकाळ-संध्याकाळ करावे. सुजेची जागा पाण्याने पुसून कोरडे करूनच वरीलप्रमाणे **शेक द्यावा,**

लम्पी आजाराच्या प्रादुर्भावामुळे जनावरांच्या आंगावर गाठी येतात.

प्रतिबंधात्मक उपाययोजना

गोवर्गीय वासरे, गाई, बैल यांचे प्रतिबंधात्मक लसीकरण करावे,

सूज शेकण्यासाठी मैगनेशिअम सल्फेटची बारीक केलेली पावडर आणि त्यामध्ये प्लिसरीन मिसळून या मिश्रणाचा लेप सुजलेल्या जागेवर दोन वेळा लावावा. सूज दोन्ही पायांमध्ये असल्यास हा लेप लावल्यानंतर सुजेखालून कापड पाठीवर बांधावे.

जनावरांच्या संपूर्ण अंगावर गाठी आहेत, त्यांचे अंग मिठाच्या द्रावणाने दिवसातून दोन वेळा पुसून घ्यावे.

जनावरे बांधण्याची जागा कोरडी असावी. जी जनावरे उठत नाहीत त्यांच्या अंगाखाली पोते, वाळलेले गवत टाकावे, त्यांची बाजू बदलत राहावी जेणेकरून त्यांना जखमा होणार नाहीत. तसेच त्यांना शक्य असल्यास

गोठा स्वच्छ ठेवावा, नियमितपणे गोठ्याचे निबंतुकीकरण करावे. त्यासाठी सोडियम हायपोक्लोराइड किंवा १ टक्का फॉम्र्यालिनचे द्रावण वापरावे.

**डास, माशी व गोचिड इत्यादी रोगप्रसारक**

**उठण्यासाठी ॲनिमल लिफ्टरचा वापर करावा.**

अंगावरील जखमांना पशुवैद्यकाच्या सल्ल्याने रोज ड्रेसिंग करावे. अंगावर कापूर आणि खोबरेल तेल याचे मिश्रण करून ठोक ठिकाणी कापसाने लावावे.

तोडातील तसेच कासेवरील जखमा पोटॅशिअम परमॅग्नेटच्या द्रावणाने धुऊन व त्यावर बोरोग्लिसरीन लावावे. लम्पीबाधित जनावरांच्या नाकामधून चिकट स्वाव येतो. तो वाळून गेल्यावर श्वास घेण्यास त्रास होतो. अशा वेळी कोमट पाण्यात कापड ओले करून नाकपुडी पुसून स्वच्छ करावी. मान वर करून नाकामध्ये बोरोग्लिसरीन टाकावे, तसेच जास्त सदाँ

कीटकांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी प्रतिबंधात्मक बाहापरोपजीविनाशकाची फवारणी करावी. यासाठी १ लिटर पाण्यात १० मिलि करंज तेल, १० मिलि कडुलिंब तेल, ४० ग्रॅम अंगाचा साथण एकत्र करून हे मिश्रण जनावरांच्या अंगावर आणि गोठ्यात ३ दिवसांच्या अंतराने तीन वेळा फवारणी करावी..

निरोगी जनावरांना बाधित जनावरांपासून स्वतंत्र बांधावे. त्यांना पाणी व चारा स्वतंत्र द्यावे.

परिसरातील रोगप्रादुर्भाव कमी होईपर्यंत नवीन जनावरांची खरेदी करू नये.

जनावरांची अनावश्यक वाहतूक टाळावी, तसेच गोवर्गीय जनावरे पशु चाजार, यात्रा व इतर ठिकाणी एकत्रित येणार नाहीत याची काळजी घ्यावी.

बाचित गोठपातील व्यक्तीना निरोगी गोठ्यात प्रवेश देताना त्यांनी आवश्यक निर्जंतुकीकरण केल्याची खात्री करावी. शक्यतो असे प्रवेश देणे टाळावे.

लम्पी बाधित जनावरांची निगा राखणाऱ्या व्यक्तीने इतर पशुपालकांच्या, पशुधनाच्या संपर्कात येऊ नये.

जनावरांना चरण्यास सोडू नये तसेच सामूहिक पाणी स्त्रोताच्या ठिकाणी पाणी पाजावयास नेऊ नये.

निरोगी जनावरांमध्ये आजाराची लक्षणे दिसतात काय? याची नियमित पाहणी करावी.

बाधित जनावरांच्या संपर्कातील निरोगी जनावरांना आयव्हरमेक्टिन इंजेक्शन दिल्यास प्रसार कमी होण्यास मदत होऊ शकते.

**कुठल्याही परिस्थितीत हा आजार लपवून ठेवू नये,**

असलेल्या जनावरांना निलगिरी तेल टाकून गरम पाण्याची वाफ द्यावी.

आजाराच्या नियंत्रणासाठी ८० टक्के सेवा-शुश्रूषा आणि २० टक्के औषधोपचार हेव तत्त्व प्रभावी असल्याचे निरीक्षण माफस् विद्यापीठातील संशोधकांनी नोंदविले आहे. त्यामुळे उपचारासोबत उत्तम व्यवस्थापन, पौष्टिक आहार, जैव सुरक्षा उपाय योजना, बाह्यपरोपजीवी कीटकनाशक प्रतिबंध या बावी अत्यंत महत्वाच्या आहेत. बाधित गाभण गाईमध्ये गर्भपात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे गाभण जनावरांची काळजी घ्यावी.

बाधित गायीच्या वासरांना सडावाटे दूध पाजणे टाळावे. त्यांना दूध उकळून थंड करून किंवा इतर निरोगी गाईचे दूध बाटलीने पाजावे,

बाधित जनावरांच्या अंगावरील गाठी जखमा, जखमांवरील खपल्या तसेच बाधित जनावरांच्या उपचारासाठी वापरलेले इतर जैविक साहित्य सर्व एकत्र करून जाळावे.

आजारातून बरी झालेली जनावरे पशुवैद्यकांच्या सल्याने पूर्ण खात्री करून निरोगी जनावरांमध्ये मिसळावीत.

बाधित जनावरांना लसीकरण करू नये.

लम्पी त्वचा आजाराचा प्रसार होऊ नये यासाठी जनावरे आणि गोठ्याची स्वच्छता ठेवावी.

लम्मी बाधित जनावरांचा मृत्यू झाल्यास शासकीय पशुवैद्यकांना याची माहिती देवून शव पाण्याच्या स्त्रोतापासून दूर आठ फूट खोल खड्डा खोदून त्यावर चुना टाकून पुरावे,

**- डॉ. संदिप शिंदे, 8208922582**
**(पशुधन विकास अधिकारी ,पशुवैद्यकीय चिकित्सालय, शिराळ, जि. बीड)**

## नवेल-उरण पाणीटंचाईवर आ. प्रशांत ठाकूर यांचा आक्रमक पवित्रा

पान १ वरून

प्रचंड संताप नागरिकांमध्ये आहे. येथील नागरिक मध्यमवर्गीय आहेत आणि कदाचित त्यांच्या कुटुंबातील दोन्हीही व्यक्ती उद्योगधंदा करतात किंवा नोकरीला जातात. आणि अशा वेळेला पाणीच नसेल तर आंघोळ करू शकत नाही अशी स्थिती आहे. त्यामुळे या लोकांची चिडचिड व त्यांना संताप होत असतो, त्या आपल्या व्यथा आमच्याकडे सतत मांडत असतात, दिवाळीच्या दिवशीही घरात पाणी नाही असे सांगतात. कितीही मागणी बैठका घेतल्या तरी अधिकाऱ्यांवर याचा काहीही फरक पडत नाही. वरिष्ठ अधिकारी या बाबतीत तर पूर्णपणे उदासीन आहेत आणि ते केवळ वेळ मारून नेतात. आम्ही धरण बांधतोय असे सांगतात मात्र उपाय निघत नाही. लोकांना आज पाणी हवे आहे आणि अधिकारी उद्या येणार आहे असे सांगतात तर आजच्या दिवशी काय करायचे हा प्रश्न नागरिकांमध्ये आहे असून पाणी विषयाच्या बाबतीत सिडकोचे पूर्ण आनंद आहे. टाटा कन्सल्ट एजन्सी नेमली गेली या एजन्सीने काम केले कि त्यांनी पैसे खाल्ले का असा सवाल करत एअर इंडियाचे झाले तसे येथेही टाटा कन्सल्टची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. गेली सहा महिन्यापासून हे टेंडर निघत नाही. मी तर गेल्या वर्षभरापासून मागणी करत होतो. टाटा कन्सल्टन्ट एजन्सीचा अहवाल सिडकोकडे येऊन दिड वर्ष झाला आहे मग पुढील कार्यवाही का करत नाही यासाठी सिडकोकडे पैशाची कमतरता आहे का असा सवालही उपस्थित केला. सिडको विमानतळ बांधत आहे, करोडोंची प्रकल्प उभारत आहे. त्यामुळे त्या ठिकाणी पुढे होणाऱ्या वसाहतींचा पाण्याअभावी काय चित्र राहणार आहे, याचीही कल्पना करायला हवी. पाणी वितरणामध्ये पाईपलाईनची दुरुस्ती करणारे, पम्प हाऊस चालविणारे, टँकर पुरवणारे ठेकेदार तसेच अभियंता सर्व मिळून पैसे खातात. यांचे करोडो रुपयांचे फ्लॅट होतात आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना याचे काहीही घेणे देणे नाही. पाणी वितरणाच्या बाबतीत ऑटोमायझेशन झाले पाहिजे यासाठी आम्ही मागणी करून करून थकलो मात्र सिडकोच्या अधिकाऱ्यांना याच्याशी घेणे देणे नाही. अधिकारी राहतात त्या ठिकाणी मॅन्युअल चावी फिरवून भरपूर पाणी आणि ठराविक ठिकाणी पाणीच नाही. त्यामुळे हे बंद करायचे असेल तर ऑटोमायझेशन शिवाय पर्याय नाही. टँकरची व्यवस्था हि पर्यायी व्यवस्था आहे. खरं तर पाइपलाईनेच पाणी मिळाले पाहिजे, आणि त्यासाठी सिडकोने करोडो रुपये शुल्क इमारतींकडून वसूल केला आहे. सिडकोची व्यवस्था सदोष आहे हे माझे यापूर्वीही बोलून झाले आहे. वसाहती वाढत चालल्या आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेची ९० हजार घरे या वसाहतीमध्ये उभी राहत आहेत मग त्यांना पाणी कुठून देणार असा सवालही आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित करत यावरही शासनाचे लक्ष केंद्रित केले. रोज नवीन इमारत उभी होते आणि पाणी मिळत नाही अशी ओरड नागरिक लोकप्रतिनिधींकडे करतात. त्यामुळे जर आधीच्याच इमारतींना पाणी मिळत नसेल तर सिडकोने नव्या सीसी ओसी देणे थांबवले पाहिजे आणि हाच यावरील उपाय आहे. पाणी पुरवठा संदर्भात अधिकाऱ्यांनी मंत्री महोदयांना दिलेली उत्तरे हि केवळ अधिकाऱ्यांचा वेळकाढूपणा आहे. लोकं संतप्त आहेत याची जाणीव अधिकाऱ्यांना नाही. सीसी ओसी थांबवली तरच त्याची झळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना लागेल. त्यामुळे या बाबतीत शासनाने गंभीर झाले पाहिजे, अशी जोरदार मागणीही आमदार प्रशांत ठाकूर यांनी करत नागरिकांच्या भावना विधिमंडळात मांडल्या.

नामदार उदय सामंत यांनी उत्तर देताना, आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाण्याच्या संदर्भात तीव्र भावना आक्रमपणे मांडल्या आहेत त्याची दखल शासन घेणार असल्याचे सांगितले. काहीही करा मॅन्युअल प्रणाली बंद करून ऑटोमायझेशनकडे जात नाही तो पर्यंत यावर योग्य पर्याय निघणार नाही असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सूचित केले आहे. सीसी, ओसी थांबवणे संयुक्तिक होणार नाही मात्र पाण्याची पातळी, पुरवठा, साठवण या संदर्भात बघितल्यानंतर ३१९ एमएलडी पाणीचे आपण पुरवठा करीत आहोत. २३ एमएलडीचा फरक आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितलेली वस्तुस्थिती खरी आहे. दोन वर्षांत काही प्रकल्प होणार आहेत मग ते होईपर्यंत पाण्यासाठी थांबायचे का हे त्यांचे म्हणणे सकारात्मक आणि बरोबर आहे. जोपर्यंत पाणी वितरणाचे ऑटोमायझेशन होत नाही तो पर्यंत त्याला पर्याय निघणार नाही, त्यामुळे दोन महिन्याच्या आत या संदर्भातील निविदा जाहीर करण्याचे निर्देश सिडकोला आजच दिले जातील, असे आश्वासन नामदार उदय सामंत यांनी देणार असल्याचे आश्वासित केले. त्याचबरोबरीने यामध्ये अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले तर त्यांच्यावर कारवाईचा बडगा उचलणार असल्याचेही त्यांनी यावेळी आपल्या निर्देशात स्पष्ट केले.

## बबनदादा पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचे थाटात उद्घाटन

दैनिक युवक आधार
**पनवेल ( वार्ताहर ) :** कमलू पाटील यांचा ३३ वा स्मृतीदिन आणि कमल गौरी हिरू पाटील शिक्षण संस्थेचा २८ वा वर्धापन दिनाचे औचित्य साधून बबनदादा पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचा उद्घाटन सोहळा तळोजा फेज-२ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात लालचंद महाराज राजे (तळोजा मजकूर) यांच्या कीर्तनाने झाली. त्यानंतर महाविद्यालयाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. उद्घाटनापूर्वी दीपप्रज्वलनाचा सोहळा प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. उद्घाटनासाठी पूजन विधी शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते, पनवेल उपजिल्हा रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. अशोक गित्ते, नवी मुंबई महानगरपालिकेचे निवृत्त उपायुक्त डॉ. जगन्नाथ सिम्मरकर, वाय.एस.टी. कॉलेजचे प्रा. डॉ. अमित अंबुलकर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, राहुल शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. जी. के. डोंगरगावकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील , उपजिल्हाप्रमुख भरत पाटील ,महानगरप्रमुख अवचित राऊत , युवा सेना जिल्हाधिकारी पराग मोहिते , मा. नगरसेवक गणेश कडू , बहुजन वंचित विकास संस्थाचे प्रदेशाध्यक्ष इकबाल नावडेकर, तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक प्रविण भगत, काँग्रेस जिल्हाध्यक्ष



बबनदादा पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचे थाटात उद्घाटन

सुदाम पाटील, समाजसेविका प्रेमाचा आप्पा आणि हॉटेल आयशाचे अफरोजभाई शेखभाई शेख यांचा समावेश होता.विद्यार्थी, शिक्षक, गावकरी आणि मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. संस्थेच्या वतीने सर्वांचे मनःपूर्वक स्वागत करण्यात आले.याप्रसंगी बबनदादा पाटील यांनी आपल्या मनोगतातून उपस्थितांना संबोधित करताना सांगितले, "मी स्वतः शिकलो नाही, पण माझी मनापासूनची इच्छा आहे की माझ्या परिसरात एकही व्यक्ती अशिक्षित राहू नये. याच प्रेरणेतून मी विविध शैक्षणिक उपक्रम राबवत आहे. पुढच्या टप्प्यात मेडिकल कॉलेज सुरू करण्याचाही मानस असल्याचे त्यांनी सांगितले .

## महाराष्ट्र राज्य अपग्रेड मुख्याध्यापक महासंघ राज्य अध्यक्षपदी माधव सावंत यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**बाळासाहेब रकटाटे**
**बीड आष्टी प्रतिनिधी**

दिनांक 13/7/25रोजी सायंकाळी सात वाजता महाराष्ट्र राज्य अपग्रेड मुख्याध्यापक महासंघ राज्य कोअर कमेटी ची ONLINE सभा राज्य कार्याधयक्ष माधव सावंत बीड यांचे अध्यक्षतेखाली व माननीय श्रीरामजी परबत संस्थापक नेते यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. प्रथमतः आपले राज्य अध्यक्ष स्वर्गीय संभाजीराव पाटील यांना विनम्र अभिवादन करून दोन मिनिट मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. माननीय राज्य सरचिटणीस भाऊसाहेब निकम यांनी संघटने बाबत महत्त्वपूर्ण मुद्दे सर्वांसमोर ठेवले.रजारोखीकरण या विषया संदर्भात मागे संभाजीराव पाटील यांचे अधिपत्याखालील कोणती कारवाई करण्यात आलेली आहे ती माहीती देण्यात आलेली आहे,रजारोखीकरण शुद्धीपत्रक फाईल प्रवास कुठून कुठ पर्यंत झाला या बाबत सदस्यांना माहीती देण्यात आली.राज्य अध्यक्ष संभाजीराव पाटील यांचे निधन झाल्या मुळे राज्य अध्यक्ष पद रिक्त झालेले आहेत त्या मुळे संघटनेतील कार्य सुरळीत सुरू ठेवणे करीता नियमानुसार व संघटनेच्या उपविधी नुसार राज्य अध्यक्षांचा प्रभार राज्य कार्याध्यक्ष माधव सावंत यांचे कडे देण्यात यावा अशा प्रकारची सुचना राज्य उपाध्यक्ष अशोक चौधरी यांनी मांडली,त्या सुचनेचा आदर ठेवून माननीय सरचिटणीस भाऊसाहेब निकम यांनी माधव सावंत राज्य कार्याध्यक्ष यांचे कडे "राज्य अध्यक्ष "या पदाचा पदभार देण्यात येत आहेत असे जाहीर केले.व सवॅ



कोअर कमेटी सदस्य यांनी अनुमोदन दिले.पुढील संघटनात्मक बाबी,संघटना अभिलेख,आर्थीक व्यवहार संदर्भात अभिलेख,उपविधी व ईतर जे काही साहीत्य असतील ते सरचिटणीस आणि प्रभार नियुक्त राज्य अध्यक्ष यांनी ताब्यात घेऊन कार्यवाही करावी असे सवॅानुमते ठरविण्यात आले. सभेला माधव सावंत,भाऊसाहेब निकम,परबत दादा,अशोक चौधरी,दत्तात्रय जपे,लिलाधर दादा सपकाळे,औदुंबर दराडे,साहेबराव बेंगाल उपस्थित होते नवनियुक्त महाराष्ट्र राज्य अपग्रेड मुख्याध्यापक महासंघ चे राज्य अध्यक्ष यांची नविन राज्य कार्यकारीणी गठीत होईपर्यंत व फेरबदल होईपर्यंत राज्य अध्यक्ष म्हणून राज्य कार्याध्यक्ष माधव सावंत यांचे कडे राज्य अध्यक्ष पदाचा पदभार देण्यात आलेला आहे. नवनियुक्त राज्य अध्यक्ष माधवराव सावंत यांचे तमाम राज्यातील उच्च श्रेणी मुख्याध्यापक बांधव/भगीनी च्या वतीने व राज्य कोअर कमेटी च्या वतीने हार्दिक हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभकामना देण्यात आल्या.


## आर. के. एफ. शाळा प्रशासनाच्या जुलमी कारभारामुळे शिक्षकांवर अन्याय : मागण्यांची पूर्तता न झाल्यास ११ ऑगस्ट पासून आंदोलनाचा इशारा.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

शाळा ही मुलांसाठी ज्ञानाचे मंदिर आहे.इथे अनेक गोष्टी शिकायला मिळतात ज्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास होतो, व्यक्तिमत्व सुधारणा होते. त्याचप्रमाणे शाळेतील शिक्षकांचे नाते हे विश्वास,आदर, सहानुभूतीवर आधारलेले असते. शिक्षक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान असू शकतात. त्यामुळे शाळेतील शिक्षक रूपी गुरु हे वंदनीय आहेत.

उरण तालुक्यातील जवाहरलाल नेहरू वसाहती मधील शाळा २० वर्षापासून इंडियन एज्युकेशन सोसायटी मुंबई या संस्थेला करारावर चालवण्यास ही शाळा दिली होती. आणि या संस्थेत शिकलेले विद्यार्थी आज सर्व क्षेत्रात नावलौकिक कमावित आहेत उच्च पदावर आहेत .अशा या संस्थेचा करार संपुष्टात आल्यानंतर निविदा काढून गेले पाच वर्षापासून आर. के.एफ संस्थेला ती चालवण्यास दिली आहे .परंतु आर. के. एफ प्रशासनाचा मनमानी, अन्यायी, जुलमी आणि गलथान कारभारामुळे समस्त शिक्षक वर्ग त्रासलेला आहे. जे एन पी ए मधील कामगार वसाहतीमध्ये केजी ते दहावीपर्यंतची इंग्रजी मराठी माध्यमांची शाळा आहेत या शाळेत २४०० विद्यार्थी ज्ञानार्जन करत आहेत. निविदा नंतर ही शाळा १ कोटी १० लाख इतक्या वार्षिक खर्चावर तयार झालेल्या मालाड मुंबई येथे रुस्तमजी केरावाला फाउंडेशन ला दिनांक १ जुलै २०१९ पासून -चालवण्यास दिली आहे. त्या अगोदर आईएएस ही संस्था ही शाळा चालवत होती.

जेएनपीए पोर्ट विद्यालय या विद्यालयातील रुस्तमजी केरावला फाउंडेशनचे प्रशासन हे क्रूर आणि अन्यायकारक धोरणं शिक्षकांच्या बाबतीत अंमलात आणत आहेत.या संस्थेच्या धोरणाप्रमाणे शिक्षकांवर जुलमी राजवट प्रस्थापित झाली आहे.




२०१९ पासून वेतन आणि इतर देयके थकवून शिक्षकांचे जीवन अक्षरशः मातीमोल करणाऱ्या या संस्थेच्या जुलमी राजवटी विरोधात शिक्षकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

आय.ई. एस .संस्था स्थापन झाल्यापासून या शाळेत मागील ३०वर्षापासून १०१ शिक्षक काम करत आहेत ,मात्र आर. के. एफ. शाळा व्यवस्थापनाने शिक्षकांच्या हिताचे नियम पायदळी तुडवून अन्यायी धोरण राबवण्यास सुरुवात केली आहे वेतन कपात, थेट निलंबन ,वेतन वेळेवर देण्यास टाळाटाळ तसेच इतर देयके लाभ ही जाणून बुजून थकवले जात आहेत. महत्त्वाचे म्हणजे सेवानिवृत्तीनंतरही लाभापासून कित्येक शिक्षक वंचित ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे शिक्षकांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. नोकरी करण्याचे वय निघून गेल्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांनी आता दुसरीकडे नोकरी कुठे करायची? हा मोठा यक्ष प्रश्न शिक्षकांपुढे उभा राहिला आहे.आणि आयुष्यभर ज्या शाळेसाठी आपले योगदान दिले आहे त्या शाळेकडून कोणताही आर्थिक लाभ या शिक्षकांना मिळालेला नसल्यामुळे, वारंवार विनंती करूनही शाळा व्यवस्थापन आणि दुर्लक्ष केल्याचा आरोप आंदोलनकर्ते शिक्षकांनी केला आहे त्यामुळे आता शिक्षकांचा संयम सुटल्यामुळे शिक्षकांनी आता संघर्षाचा निर्धार केला आहे. शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांची पूर्तता व अन्याय दूर न झाल्यास ११ ऑगस्ट पासून बेमुदत आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे ११ ऑगस्ट पासून शाळेत एकही शिक्षक कामावर जाणार नाही ,सर्वजण बेमुदत उपोषणाला बसतील. आणि या उपोषणादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी रुस्तम जी केरावाला फाउंडेशनची असेल जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयातील शिक्षकांनी या संघर्षामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे .पुढे आता या संस्थेच्या विरोधात जनता पेटून उठण्याची शक्यता निर्माण झाली आहे.आर के एफ प्रशासनाच्या या अन्यायी कारभारामुळे शिक्षकांवर जे बेतले आहे त्यामुळे त्यांचे मनोबल खचले आहे.याचा परिणाम त्यांच्या स्वास्थ्यावर होऊ शकतो, लवकरच यातून मार्ग काढण्यासाठी शासनाने लक्ष केंद्रित करावे .असे पालक, विद्यार्थी व नागरिकांकडून बोलले जात आहे.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## परिचारिकांच्या न्यायहक्कासाठी तीव्र आंदोलनाची हाक —१८ जुलैपासून कामबंद आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

मुंबई : राज्यातील परिचारिकांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित मागण्या मान्य न झाल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेने अखेर तीव्र आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. संघटनेच्यावतीने दिनांक १५ व १६ जुलै २०२५ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे धरणे आंदोलन व निदर्शने चालू आहेत. शासनाने मागण्या मान्य केल्या नाहीत, तर दिनांक १८ जुलैपासून राज्यव्यापी बेमुदत कामबंद आंदोलन पुकारण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

परिचारिका संघटनेच्या मुख्य मागण्या पुढीलप्रमाणे आहेत:
२०१६ पासून प्रलंबित असलेला सातवा वेतन आयोग तातडीने लागू करावा
परिचारिकांच्या वेतनातील तूट भरून काढावी
रिक्त पदांची तत्काळ भरती करावी
परिचारिका, अधिपरिचारिका, पाठ्य निर्देशिका यांच्यावरील अन्यायकारक धोरणे रद्द करून न्याय्य मागण्या मान्य कराव्यात
संघटनेचे अध्यक्ष डॉ. मनीषा शिंदे यांनी सांगितले की, "शासनाने २०१९ मध्ये समिती स्थापन करूनही आजपर्यंत कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही. २०२२ मध्ये जाहीर केलेली भरतीही रखडली आहे. यामुळे परिचारिकांमध्ये असंतोष वाढला असून, मानसिक, आर्थिक आणि शारीरिक त्रास सुरू आहे." संघटनेचे कार्याध्यक्ष श्री. अरुण कदम, उपाध्यक्ष श्री. भिमराव चक्रे, तसेच पदाधिकारी शहजाद बाबा खान व सुमित्रा तोटे यांनी आंदोलनाची रूपरेषा जाहीर केली आहे. संघटनेने सर्व परिचारिकांना शांततेने आणि लोकशाही मार्गाने आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. राज्य शासनाकडून यावर काय भूमिका घेतली जाते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



# FWICE वाद : ज्युनिअर आर्टिस्ट असोसिएशनचा तीव्र निषेध,

## फेडरेशनमधून बाहेर पडण्याचा निर्णय अरविंद सकट पुन्हा अध्यक्षपदी

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

मुंबई, दि. १५ जुलै २०२५ –फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईज (FWICE) कडून ज्युनिअर आर्टिस्ट असोसिएशनचे अधिकृत खाते एकतर्फी व बेकायदेशीरपणे रद्द केल्याच्या निषेधार्थ संघटनेने आज मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत जोरदार भूमिका मांडली.असोसिएशनचे अध्यक्ष अरविंद सकट, सचिव, पदाधिकारी व सदस्यांनी फेडरेशनमधील गटबाजी, अन्यायकारक वागणूक आणि मनमानी निर्णयांविरोधात संताप व्यक्त करत, FWICE वरील विश्वास उडाल्याचे स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, FWICE अधिकारी अशोक दुबे, गंगेश्वर श्रीवास्तव, तिवारी आणि राजा फिरोज खान यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता खाते रद्द केले, हे अत्यंत नियमबाह्य असून, हा प्रकार संघटनेच्या स्वायत्ततेवर घाला घालणारा आहे. अरविंद सकट यांनी पत्रकार परिषदेत ठामपणे सांगितले,

"आम्ही कायदेशीर व संघटनात्मक मार्गाने याचा तीव्र विरोध करू. सदस्यत्वाचे हक्क कुणालाही हिरावून घेता येत नाहीत." या पार्श्वभूमीवर, संघटनेची विशेष बैठक घेण्यात आली असून, त्या बैठकीत एकमुखी निर्णय घेऊन FWICE मधून बाहेर पडण्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. याच बैठकीत नव्याने निवडणुकीची प्रक्रिया पार पडली असून, घटना व नियमानुसार एक महिना अगोदर नोटीस देऊन निवडणुका जाहीर करण्यात आल्या होत्या.

सर्व पदांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले असून, अरविंद सकट यांची पुन्हा अध्यक्षपदी निवड झाली आहे. ज्युनिअर आर्टिस्ट असोसिएशनने स्पष्ट केले की, ही लढाई केवळ संघटनेच्या अस्तित्वाची नसून, सर्व कलाकारांच्या हक्क आणि न्यायासाठीची आहे.




# "काटा फुटला," नवीन मराठी गाणं रसिकांना भुरळ पाडणार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

स्वर्गीय दादा कोंडके यांच्या 90 च्या दशकातील प्रेक्षकांना खळखळून हसवणारे डबल मिनिंग असलेले गाणे प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले होते दादा त्या गाण्यांमुळे रातोरात सुपर डुपर रेकॉर्ड करून आपलं नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड मध्ये मानाचा स्थान पटकावणारा मराठमोळा अभिनेता ठरला निर्माता डायरेक्टर अभिनेता ते गीतकार असे सर्व गुण संपन्न असणारा दादा आपल्या प्रेक्षकांच्या गळ्यातला ताईत कधी झाला हे कोणाला कळलंच नाही त्यांच्या जाण्याने जी डबल मिनिंग गाण्यांची उणीव व प्रेक्षकांना हसवण्याचे काम व दादांची प्रेरणा घेऊन अभिनेते दिग्दर्शक प्रमोद पंडित यांनी आपल्या नवीन




येणाऱ्या "काटा फुटला,"डबल मिनिंग गाण्यामधून प्रेक्षकांना नक्कीच दादांची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही व प्रेक्षकांचे मनोरंजन देखील होईल असा विश्वास अभिनेते प्रमोद पंडित यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितला यामध्ये अभिनेत्री जया कोरे व बालकलाकार स्वराज साबळे खूप छान काम केले आहे विशेष कॅमेरामन:आबा निर्मळ, गायिका:ऐश्वर्या जाधव, गीतकार: रंगनाथ का साळवे ,संगीतकार: मधु रेडकर, विशेष सहकारी ज्ञानदेव शिंदे, अविनाश पवार, अभिजीत साबळे, अधि, काटा फुटला मराठी डबल मिनिंग साँग लवकरच आपल्या भेटीस

## अबरार मास्टर कच्छी यांची मानवी हक्क संरक्षण फेडरेशनच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी निवड

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

मानवी हक्क संरक्षण फेडरेशनच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी अबरार मास्टर कच्छी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मुनीर तांबोळी यांनी कच्छी यांना मुंबई येथे नियुक्तीपत्र देऊन त्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. अबरार मास्टर कच्छी हे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात अनेक वर्षांपासून सक्रिय आहेत. समाजातील विविध घटकांसाठी, विशेषतः अल्पसंख्याक आणि दुर्बळ घटकांच्या हक्कांसाठी त्यांनी सातत्याने आवाज उठवला आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि संघटन कौशल्याचा फायदा फेडरेशनच्या देशव्यापी कार्याला निश्चितपणे होईल, असा विश्वास डॉ. मुनीर तांबोळी यांनी यावेळी व्यक्त केला. या महत्त्वपूर्ण नियुक्तीबद्दल बोलताना अबरार मास्टर कच्छी यांनी मानवी हक्क संरक्षण फेडरेशनचे आणि राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मुनीर तांबोळी यांचे विशेष आभार मानले. ते म्हणाले, "संपूर्ण



देशभरातील नागरिकांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे. फेडरेशनने माझ्यावर टाकलेला हा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करेन आणि समाजातील पीडित व वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी या पदाचा प्रभावीपणे वापर करेन." अबरार मास्टर कच्छी यांच्या नियुक्तीमुळे मानवी हक्क संरक्षण फेडरेशनच्या राष्ट्रीय स्तरावरील कार्याला अधिक बळकटी आणि गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पामध्ये रिसोड तालुक्यामधील पैनगंगा नदीवरील को पो बंधाऱ्याचे बॅरेज मध्ये रूपांतर करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**रणजीत सिंह ठाकुर**

13/07/2025 रोजी विधान भवन मुंबई येथे आपल्या राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांना वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पामध्ये आमच्या वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यामधील पैनगंगा नदीवरील को,पो बंधाऱ्याचे बॅरेज मध्ये रूपांतर करण्यात यावेत वाशिम जिल्हा हा अनुशेष जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे त्यातल्या त्यात रिसोड तालुक्यामध्ये सिंचनाच्या दृष्टीने कुठलाही मोठा प्रकल्प नसल्याकारणाने तालुक्यातील शेतकरी बांधवांना नेहमीच दुष्काळाचा सामना करावा लागतो सिंचनाच्या दृष्टीने रिसोड तालुका अत्यंत मागासलेला विभाग आहेत त्या दृष्टीने को,पो, बंधाऱ्या चे बेरीजेस मध्ये रूपांतर केल्याशिवाय पर्याय उपलब्ध राहणार नाही वाशिम जिल्ह्यातील पैनगंगा नदीवरील बालखेड भापूर धोडप



मसलापेन आसेगाव या 5 को पो. बंधाऱ्याचे बॅरेजस मध्ये रूपांतर करण्यासंबंधी सर्वच लोकप्रतिनिधी सह समस्त शेतकऱ्याची अनेक वर्षापासून मागणी आहे वरील को,पो, बंधाऱ्याचे तसेच मसला पेन को पो बंधाऱ्याचे बॅरेज मध्ये रूपांतर करण्याकरिता मी अनेक वर्षापासून पाठपुरावा करीत आहे परंतु पाणी उपलब्धता प्रमाणपत्र नसल्याकारणाने प्रकल्पाचे प्राथमिक सर्वेक्षण अहवाल तयार असूनही सदर सदर प्रकल्प अनेक वर्षापासून रखडलेले आहे तथापि आपल्या वैनगंगा नळगंगा नदीजोड या महत्वकांक्षी योजनेमध्ये टप्पा क्रमांक 4 नळगंगा धरण ते पैनगंगा मुख्य कालवा व वाशिम जिल्ह्यातील तुटीचे क्षेत्र याचा समावेश आहे तरी या योजनेअंतर्गत रिसोड तालुक्यातील पैनगंगा नदीवरील बाळखेडा ,भापूर ,धोडप ,,मसलापेन ,आसेगाव या 5उपबंधाचे बॅरेज मध्ये रूपांतर करण्याचा समावेश करण्यात यावा व सदरच्या कामाचे सर्वेक्षण करणेबाबत निर्देशित करण्यात यावे वैनगंगा नळगंगा योजनेअंतर्गत सदर प्रकल्प समाविष्ट केल्यास उपरोक्त प्रकल्पाकरिता असलेली पाण्याची तुट संपूर्ण भरून निघेल त्यामुळे रखडलेले आमचे रिसोड तालुक्यातील प्रकल्प पूर्ण करण्यास मदत होईल याबाबत आज विधान भवन येथे भाजपाचे वाशिम मंगरूळपीर मतदार संघाचे लोकप्रिय आमदार श्याम भाऊ खोडे भाजपाचे उत्तर भारतीय महाराष्ट्र प्रदेश सचिव लखनसिंह ठाकुर त्यांच्या समवेत भाजपाचे वाशिम माजी नगराध्यक्ष अशोक भाऊ हेडा यांच्यासह आपल्या राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांची भेट घेऊन निवेदन देऊन सदर बाब निदर्शनात आणून दिली आदरणीय मुख्यमंत्री महोदयांनी सदर वैनगंगा नळगंगा नदीजोड योजनेअंतर्गत सदर प्रकल्प बेरीज मध्ये रूपांतर करण्याबाबत निवेदनावर रिमार्क करून शाश्वती दिली

# "त्या"डॉक्टराचा अटकपूर्व जामीन अर्ज भंडारा न्यायालयाने फेटाळला

## प्रकरण साकोली येथील अल्पवयीन दलित मुलीसोबत अश्लील कृत्याचे ; आरोपी डॉक्टर १० दिवसांपासून अद्याप फरारच

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा** - शहरातील नामांकित श्याम हॉस्पिटल येथील डॉ. देवेश अग्रवाल यांनी ९ जुलैला एका अल्पवयीन मुलीसोबत सोनोग्राफी कक्षात अर्धा तास अश्लील कृत्य केले होते. याप्रकरणी पिडीत मुलीच्या आईने साकोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. याप्रकरणी पोलीसांनी लैंगिक छळाच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेच्या दिवसांपासून आरोपी डॉक्टर फरार आहे. बुधवार १६ जुलैला आरोपी डॉ. देवेश अग्रवाल याचा अटकपूर्व जामीन अर्ज भंडारा येथील जिल्हा व सत्र न्यायालय फेटाळला आहे. आरोपी डॉक्टरने एका १७ वर्षीय दलित अल्पवयीन मुलीसोबत सोनोग्राफी कक्षात केलेल्या अश्लील कृत्याचे साकोलीसह जिल्हयात संतप्त पडसाद उमटले होते. नराधम डॉक्टरला अटक करा,




या मागणीसाठी विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांनी पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन दिलेले आहेत. ९ जुलैला शहरातील नामांकित असलेल्या श्याम हॉस्पिटलचे डॉ. देवेश अग्रवाल यांनी १७ वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत सोनोग्राफी कक्षात अर्धा तास गैरकृत्य केले. पिडीत मुलीच्या आईने साकोली पोलीस ठाणे गाठले व डॉक्टर विरोधात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तात्काळ आरोपी डॉ. देवेश अग्रवाल यांचे विरूद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ६४ (२), (१), ६५ (१) तसेच बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ व अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. तेव्हापासून आरोपी डॉक्टर फरार आहे. साकोली पोलीस त्याच्या शोधासाठी महाराष्ट्रासह मध्यप्रदेशापर्यंत पोहचली आहे. मात्र अद्याप आरोपी पोलिसांना गवसला नाही. या घटनेनंतर साकोली शहरासह जिल्हयात आरोपीच्या अटकेची मागणी जोर धरत आहे.

बुधवार १६ जुलैला आरोपी डॉक्टर देवेश नरसिंगदास अग्रवाल यांच्या वकीलामार्फत भंडारा जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज सादर केला होता. तो जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे. फरार आरोपी डॉक्टर हा विदेशात जाऊन लपला तर नसावा अशा चर्चा नागरिकांत सुरू आहेत.

# मतदारांनी युतीचे सरकार पुन्हा आणले ही मनाची श्रीमंती फक्त भाजपा मध्ये आहे.

## पद्मश्री खासदार उज्वल निकम

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी : प्रविणभाऊ पवार**

पद्मश्री ॲड. उज्ज्वल निकम जी यांची राज्यसभेवर नियुक्ती झाल्याबद्दल आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत मिळालेल्या मानांकन बद्दल महाराष्ट्र सांस्कृतिक मंत्री एड. आशिष शेलार यांचा भारतीय जनता पार्टी उत्तर मध्य मुंबई जिल्ह्याच्यावतीने बिल्लाब दि.१६ जुलै २०२५ रोजी बिल्लावा भवन, सांताक्रूझ (पुर्व), मुंबई येथे आयोजित विशेष सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी उज्वल निकम म्हणाले की, ज्यावेळी योद्धा लढाई मध्ये असतो. त्यावेळेला जय पराजय होत असतो, पराजय का झाला त्यातून आपण काही वेळेला कारणे शोधतो. पराभवाचे खापर



आपण कोणावर फोडण्याचे आपण पाप करत असतो. पण मी तर कुठेही कोणावर केले नाही. पण मी येवढच सांगितले की, आपण एकत्रित जमलेले आहोत ही आपली शोकसभा नाही. आपल्याला उत्साहानी पुढे कामाला लागले पाहिजे. आणि मला आनंद आहे. आपल्या जिल्ह्यांनी गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये ज्या उमेदवारांनी आपल्याला मदत केली नाही, यांचा सारासार विचार केला नाही. आशिषजी ह्या आमच्या जिल्हाची ही मनाची श्रीमंती आहे. आणि म्हणून या श्रीमंतीतून आम्हाला कोणी मदत केली नसली तर आम्ही यावेळेला आमच्या जिल्ह्यातील प्रत्येक उमेदवाराला आम्ही मदत केली. या मतदारांनी युतीचे सरकार पुन्हा आणले ही मनाची श्रीमंती फक्त भाजपा मध्ये आहे. हे मी पुन्हा एकदा ठासून सांगतो. मी एक गोष्ट नक्की सांगतो की, मी जरी त्या निवडणुकीत हरलो होतो. तरी मी विजलो नव्हतो, हा माझा अंत नाही. पेटून उठलो नव्या दमाने असवशी सामना करायला, आमचे सामर्थ्य नाशवंत नाही हे त्या पागलांना कळलेच नाही. आपल्या आशिषजी नी फार मोठे काम केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गडकिल्ले युनोस्कोच्या जागतिक यादीत मिळवून दिले. खरोखरच आशिषजी आज आपल्या लोकांना इतिहास शिकविणे फार महत्त्वाचे आहे. आज दुर्दैवाने स्वतंत्र करता हिंदू धर्माकरता या देशातील गोरगरीब रयतेसाठी ज्या छत्रपती शिवाजी महाराज लढाई केली त्याचे आज संपूर्ण देशात एक नाही आहे. यावेळी आशिषजी म्हणाले की, उज्वल निकम हे असे व्यक्तिमत्त्व आहे की, ज्यांना पक्षांनी निवडणूक लोकसभेची लढा असे ज्यावेळी म्हटले त्यावेळेला त्यांनी पक्षाच टिकिट मला द्या असे कधीही म्हटले नाही. किंबहुना आमच्या वारंवार आपल्यावर प्रेम करणारा व्यक्ती वरिष्ठ विधीवत म्हणून अशी यशस्वी कारकीर्दीत असलेल्या विधती ज्यावेळी देवेंद्र बावनकुळे आणि मी आम्ही त्यांना भेटलो आणि त्यावेळी मी त्यांना म्हटलो होतो की, तुमच्या नावांमध्ये दम आहे. या समारंभात ॲड. उज्ज्वल निकम जी यांचा सन्मानपूर्वक सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. त्यांच्या न्यायालयीन कारकिर्दीतील कर्तृत्व आणि देशसेवेबद्दलचा गौरव हा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. या कार्यक्रमाला आमदार संजय उपाध्याय, आमदार पराग अळवणी, उत्तर मध्य मुंबई जिल्ह्याचे अध्यक्ष विरेंद्र म्हात्रे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बापूजी विद्यालय सावरगांव रोकडा येथे विद्यार्थी संसदेची निवड

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

बापूजी विद्यालय सावरगांव रोकडा येथे आज बुधवार दिनांक 16-07-25 रोजी विद्यार्थी संसदेची निवडणूक लोकशाही पद्धतीने घेण्यात आली निवडणूक कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री घोटे राजकुमार सर हे होते व पर्यवेक्षक श्री हराळे जयप्रकाश व विद्यार्थी संसद विभागाचे निवडणूक अधिकारी म्हणून श्री संतोष गिरी सर यांनी काम पाहीले निवडणूकीचा कार्यक्रम अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला.




विद्यार्थी संसदेचे पदाधिकारी पुढील प्रमाणे आहेत.
सचिव कु. सादिया शेख
सांस्कृतिक विभाग प्रमुख सुमेधा घोगरे
सहल विभाग प्रमुख श्रावणी इंगळे
क्रीडा व स्वच्छता विभाग रोकडे प्रतीक्षा
पुस्तक व वाचन विभाग मदने लक्ष्मी
महिला विभाग ऋतुजा सोनवणे
मराठी विभाग बंडेवाड कृष्णा
हिंदी विभाग दिव्या जाधव
इंग्रजी विभाग प्रिया वाघ
गणित विभाग महेक अत्तार
विज्ञान विभाग विश्व तंबुरे
सामाजिक शास्त्र विभाग शेख बीबीहजरा

या निडीबद्दल संस्थेचे सचिव डी.बी.लोहारे गुरूजी,सह सचिव सौ.सुनितााताई चवळे मॅडम संस्थेचे अध्यक्ष मा.श्री डॉक्टर अशोकरावजी सांगविकर साहेब व शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले

# घरात सिलेंडरचा स्फोट,आगीत रोखेसह संपूर्ण साहित्य बेचीराख

**धानोरा तांडा येथील घटना**
**दैनिक युवक आधार**
**उमेश साखरकर**
**दिग्रस तालुका प्रतिनिधी**

तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या धानोरा तांडा येथे एका घरात सिलिंडरचा स्फोट होऊन घराला भीषण आग लागली. यामध्ये घरातील दुचाकी, टिव्ही, घरगुती वापराच्या वस्तू, धान्य, भांडे, कपडे यासह रोख रक्कम असे लाखोंचे साहित्य जळून खाक झाले. यामुळे संपूर्ण कुटुंब उघड्यावर आले आहे. ही घटना बुधवारी ११: ३० वाजताच्या सुमारास घडली. राजुसिंग उंद्रा शेरे रा. धानोरा तांडा असे आगीत नुकसानग्रस्त व्यक्तीचे नाव आहे. प्राप्त माहितीनूसार बुधवारी नेहमीप्रमाणे राजू त्यांची पत्नी आणि मुले शेतात कामासाठी गेले होते. दरम्यान, सकाळी ११ वाजताच्या सुमारास परिसरातील शेजाऱ्यांना त्यांच्या घरातून धुर निघत असतांना दिसून आला.घरात काहीतरी पेटत असावे, असा संशय आल्यामुळे त्यांनी घराकडे धाव घेतली. तसेच आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. तसेच याबाबत राजूसिंग यांना माहिती देण्यात आली. दरम्यान, काही वेळातच शेरे यांच्या घरातील गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन घराला भीषण आग लागली. या स्फोटाची तिव्रता इतकी गंभीर होती की, घरावरील संपूर्ण टिनपत्रे उडाले. त्यानंतर गावकऱ्यांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले. घटनेनंतर रितेश राठोड यांनी तहसील प्रशासनाला ही माहिती दिली. त्यानंतर मंडळ अधिकारी सोनोणे, तलाठी गाडे यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. यामध्ये घरातील संपूर्ण साहित्यासह रोख जळून खाक झाल्याने मोठे नुकसान झाले आहे.



# पावसाळी पादत्राणांमुळे तुम्हालाही सतावतेय गुडघेदुखीची समस्या?-डॉ अभय छल्लानी, ऑर्थोपेडिक सर्जन,

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई* प्रतिनिधी**

पावसाळ्यात आपल्या पादत्राणांकडे लक्ष देणे व योग्य निवड करणे आवश्यक आहे.पावसाळ्यात चुकीच्या पादत्राणांचा वापर केल्यास गुडघे, पाठदुखी आणि घोट्याच्या दुखापतींचा धोका वाढू शकतो. या दिवसात उंच टाच आणि गुळगुळीत पृष्ठभाग असलेली चप्पल वापरणे टाळा. पावसाळ्याच्या दिवसात रस्त्यावर पाणी तुंबते, त्यामुळे अनेकवेळा रस्त्यावर मोठे खड्डे पडलेले दिसत नाहीत आणि अशा परिस्थितीत अपघाताची शक्यता वाढते. बहुतेकदा लोकं या दिवसात कोरडे राहणे आणि संसर्ग टाळण्यासंबंधी विविध उपाययोजना राबवतात मात्र पादत्राणांशी संबंधित होणाऱ्या सांधेदुखीकडे मात्र दुर्लक्ष करतात. पावसाळ्यात चुकीच्या पादत्राणांचा वापर केल्याने गुडघे, घोटे आणि अगदी तुमच्या कंबरेजवळील स्नायुंवरही ताण येऊ शकतो. या दिवसात बरेच जण फ्लिप-फ्लॉप, सँडल्स किंवा गुळगुळीत पृष्ठभाग असलेल्या स्लीपर्सची निवड करतात, परंतु ते पुरेसा आधार देऊ शकत नाहीत. कालांतराने, असमान किंवा ओल्या पृष्ठभागावर चालल्याने सांधे कडक होणे, पडणे किंवा सांध्यांचे दीर्घकालीन नुकसान होऊ शकते, विशेषतः ज्यांना आधीच गुडघे किंवा पायाचे आजार आहेत त्यांना यामुळे अधिक त्रास होण्याची शक्यता असते. गुडघ्यांच्या बाबतीत अत्यंत सावधगिरी बाळगा. तज्ञांच्या मदतीने योग्य प्रकारचे पादत्राणांची निवड करा.

**या पावसाळ्यात तुमचे गुडघे आणि घोटे सुरक्षित ठेवण्यासाठी या आहेत खास टिप्स**

योग्य पादत्राणांची निवड करा* : रबर-सोल असलेले शूज किंवा अँटी-स्लिप तंत्रज्ञान वापरण्यात आलेली पादत्राणे निवडण्याचा प्रयत्न करा. यामुळे पडणे आणि घोटे दुखापतींचा धोका कमी होतो आणि तुम्हाला कोणत्याही आव्हानाशिवाय पावसाळ्याचा आनंद घेता येतो. या दिवसात उंच टाचांची पादत्राणे वापरणे टाळा. योग्य आधार देणारी पादत्राणे निवडा* : आर्च सपोर्ट आणि कुशनिंग असलेले शूज तुमच्या गुडघ्यांवरील दबाव कमी करण्यास मदत करतात आणि चालताना तुमच्या सांधांवर ताण येत नाही.

चप्पल वापरणे टाळा* : फ्लॅट सँडल्स आणि फ्लिप-फ्लॉप कोणतेही संरक्षण देत नाहीत. जास्त वेळासाठी यांचा वापर केल्याने गुडघे आणि टाचांना वेदना होऊ शकतात.

एक अतिरिक्त जोड सोबत ठेवा* : जर तुमचे शूज ओले झाले तर ते दिवसभर घालू नका. ते बदलण्यासाठी एक अतिरिक्त कोरड्या पादत्रांणांचा जोड सोबत ठेवा आणि ओली पादत्राणे योग्यरित्या सुकवा आणि मगच त्यांचा वापर करा.

तुमचे तळवे नियमितपणे स्वच्छ करा* : तळवे कोरडे आणि स्वच्छ ठेवल्यास अपघातांची शक्यता कमी होते.पावसाळ्यात तुमच्या पायांना योग्य आधार देणाऱ्या पादत्राणांचा वापर करा

*गरज भासल्यास ऑर्थोटिक इनसोल्स वापरा* : जर तुम्हाला गुडघ्यांचा त्रास असेल किंवा फ्लॅट फुटची समस्या असेल तर पायांना योग्य आराम आणि आधाराकरिता ऑर्थोटिक इनसोल्स वापरा. पावसाळ्यात तुमची निवडलेली पादत्राणे केवळ खड्ड्यांपासून तुमचे संरक्षण करत नाहीत तर ती सांध्यांना देखील पुरेसा आधार देते. पाय घसरणार नाही, पायांच्या वेदना दूर राहतील अशा पादत्राणांची निवड करुन तुम्ही या पावसाळ्याचा मनमुराद आनंद घेऊ शकता.

# तळा तालुक्यातील 25 ग्रामपंचायतीचे आरक्षण सोडत जाहीर.

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी नितीन लोखंडे.**

**तळा** : सन 2025 ते 2030 या कालावधी करता पंचवीस ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाची थेट आरक्षण सोडत तळा तहसील येथील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी सभागृहांमध्ये तळा तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी श्रीमती. स्वाती पाटील मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दि. 15 जुलै रोजी पार पडली. जिल्हाधिकारी रायगड यांच्या आदेशान्वये सरपंच पदासाठी आरक्षण कार्यक्रम जाहीर करण्यात आला. या आदेशान्वये तळा तालुक्यामध्ये मंगळवार 15 जुलै रोजी आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. या आरक्षण सोडतीमध्ये काही इच्छुक उमेदवारांची निराशा झाली तर काही इच्छुक उमेदवारांना दिलासा मिळाला आहे. या कार्यक्रमाप्रसंगी नायब तहसीलदार श्री पालांडे सर, निवडणूक नायब तहसीलदार श्री टेंबे सर, महसूल नायब तहसीलदार श्री. पाटील सर, तसेच इच्छुक उमेदवार, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जाहीर करण्यात आलेल्या आरक्षण सोडतीचा तपशील पुढील प्रमाणे. निगुडूशेत - अनुसूचित जाती, वांजळोशी - अनुसूचित जाती महिला, मेढे- अनुसूचित जमाती, बोरघर हवेली - अनुसूचित जमाती महिला, महागाव - अनुसूचित जमाती महिला, पिटसई - अनुसूचित जमाती, मालुक - नामाप्र, वरळ,- नामाप्र, चरई खुर्द - नामाप्र महिला, रोवळे - नामाप्र, तळेगाव तर्फे तळे - नामाप्र, शेणवली - नामाप्र महिला, मजगाव - सर्वसाधारण महिला, उसर खुर्द - सर्वसाधारण महिला, काकडशेत - सर्वसाधारण, गिरणे - नामाप्र महिला, पडवण - सर्वसाधारण, पन्हेळी - सर्वसाधारण महिला, सोनसडे - सर्वसाधारण महिला, भानंग - सर्वसाधारण, वानस्ते - सर्वसाधारण महिला, मांदाड - सर्वसाधारण, फळशेत कर्नाळा - सर्वसाधारण महिला, रहाटाड - सर्वसाधारण, वाशी हवेली - सर्वसाधारण महिला.

# शौर्यप्रताप पिसे शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यात दुसरा

**दैनिक युवक आधार**
**मिरजगांव, सतीश शिंदे**



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा फेब्रुवारी २०२५ च्या गुणवत्ता याद्या नुकतेच जाहीर करण्यात आल्या.या परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मिरजगाव मुले शाळेचा विद्यार्थी शौर्यप्रताप तानाजी पिसे याने १९२ गुणांसह सेट के यादीतून अहिल्यानगर जिल्हा गुणवत्ता यादीत दुसरा क्रमांक पटकावला.शौर्यप्रताप पिसे याने यापूर्वी देखील अनेक परीक्षेत यश संपादन केले आहे.एन एम एम एस या परीक्षेत पात्र, शासकीय चित्रकला परीक्षा ( एलिमेंटरी परीक्षा) उत्तीर्ण, विज्ञान प्रदर्शनात उलेखनीय यश, केंद्रस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत क्रमांक अशा अनेक परीक्षा व स्पर्धेत यश प्राप्त केले आहे. त्याला मार्गदर्शक म्हणून वर्गशिक्षक दिपक कारंजकर सर यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापक नितीन काळे सर, अकबर शेख सर,संजय थोरात सर,शमीम सय्यद मॅडम, सुनिता गुगळे मॅडम, प्रविण सरोदे सर, मेघा गोरे मॅडम,अनिल विधाते सर,वैशाली लकडे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी प्रदीप चव्हाण साहेब, विस्तार अधिकारी उज्वला गायकवाड मॅडम,विस्तार अधिकारी बबन नरवडे साहेब, केंद्रप्रमुख प्रशांत त्र्यंबके साहेब, शाळा व्यवस्थापन समिती व पालक आदींनी अभिनंदन केले.

# "आईच्या कुशीत बाळ खेळावे तशा या बालकविता! "

'लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा' असं आपण अनेक वेळा ऐकलं आहे. पण लहान होणे किती अवघड असतं ना? शिक्षण क्षेत्रात तर उलटीच गंगा वाहते आहे . ज्या मुलांना कळतं त्या मुलांना शिकवणाऱ्या प्राध्यापक शिक्षकांना भलताच पगार असतो परंतु ज्या मुलांना आई बाबाची भाषा सोडली तर बाकी काही समजत नाही अशा चिखलाच्या गोळ्याला आकार देण्याचं काम करणारे अंगणवाडीचे असतील किंवा प्राथमिक शाळेचे असतील या शिक्षकांना इतरांपेक्षा दाम कमीच मिळतो. या शिक्षकांना त्या मुलांची आई व्हावे लागते तेव्हा कुठे मुले ज्ञानाचा सुगंध घेतात.वयाने मोठी असलेल्या माणसांना मनाने चिमुकल्यासारखे छोटे होणं एवढे सोपे नाही.ही किमया साधली आहे ती कवी मित्र 'रमाईसूत' प्रदीप पिंपळनेरकर यांनी अचूक शब्दात 'बालगाणी'



मांडली आहेत. गुणगुणत रहावीत, पुन्हा पुन्हा गात रहावीत अशा या बालकविता आहेत. या कवितेत निसर्गाच्या कुशीतील पक्षी, प्राणी, फुले पानोपानी आपल्याशी खेळतात. कवी मनातून शिक्षक आहेत, त्यांची मुलांशी, ज्ञानाशी असलेली नाळ त्यांनी समृद्ध केली आहे. बालमनावर सुसंस्कारांची रुजवण करण्यासाठी, तेजोमय दीप तेवत ठेवण्यासाठी कवी प्रदीप ' पाखरांची शाळा ' या कवितेत म्हणतात की,----

अशी आम्हा भेटली पाखरांची शाळा
हसत खेळत शाळेचे नियम पाळा....

ही कविता बराच काही शिस्तीचा संदेश देते.
कवीला खेळातलं घर फार आवडते .ते म्हणतात--

घड्याळ वाजे टिक टिक ..
घर ठेवा ठीक ठीक..

किती सहज,साधे, आपले व्यवहारातले, अवतीभवतीचे सोपे सोपे शब्द कवितेत वापरले आहेत.
जंगलातील प्रदीप गुरुजींना लोकशाही यावी असे वाटते. प्राणीसंमेलन ही कविता खास वाचकांनी हे पुस्तक घेऊन ,शोधून वाचावी एवढी भन्नाट कविता आहे. 'चल ग सई' ही कविता खास चिमुकल्यांचं भावदर्शन घडवते .यातली सई कशी रुसते? मग तिला विणवतात कसे? सई हसते कशी? आलेली संधी दवडू नये, ती वाया घालू नये असा मस्त संदेश देणारी ही कविता आहे. या बालकवितामध्ये कुठेही ओढून जाणून यमक आणले नाही अथवा शब्दांची ओढाताण केली नाही .तर सहज अलगद आईच्या कुशीत बाळ खेळावे तसे कवितेच्या कुशीत हे शब्द खेळत आहेत. अवतीभोवतीचे विश्व हरवून जाण्याची ताकद या कवितेत आहे. मनावरला ताण नाहीसा होऊन या शब्दांशी खेळत रहावे अशा या कविता आहेत. प्रदीप गुरुजी हे मुलाफुलात रमणारे प्रयोगशील शिक्षक आहेत. शिक्षकांनी शिक्षण सोडून इतर काहीही करू नये तरच मुलांच्या विषयाला न्याय देता येईल ही जाणीव या गुरुजींच्या कवितामध्ये दिसून येते. चला आपणही खूप खूप लहान होऊया तरच या कविता आपल्या होतील.

**- भारत सातपुते**
**लातूर**

# शाळेच्या 'फी 'वाढीवर आता बसणार लगाम. :"शाळेच्या शुल्काबाबत लवकरच नियमावली जाहीर होणार 'शालेय शिक्षण मंत्र्यांची घोषणा

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

दिवसेंदिवस शाळेतील वाढत्या फी चा आकडा सर्वसामान्य जनतेला आवाक्याबाहेर चा होत आहे. फी भरण्याची ऐपत नसली तरी एखादा पालक मुलाचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून जीवाचे रान करून शाळेच्या फी भरत आहे. दिवसेंदिवस ही परिस्थिती अधिकच बिकट होत चालली आहे.

परंतु आता शाळांनी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क किती वाढवावे? याबाबत काही नियम आहेत, शाळेला या शुल्काबाबत मनमानी करता येऊ नये म्हणून नवीन नियमावली लवकरच आणली जाईल .असे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी बुधवारी विधानसभेत सांगितले.








दर तीन वर्षांनी १५ टक्के शुल्क वाढवले जाईल आणि इतर नियमांची सर्रासपणे पायमल्ली केली जाते. याकडे आता लक्ष वेधले आहे याशिवाय शालेय वस्तूंची खरेदी विशिष्ट दुकाने कंपन्यांकडून करण्याची सक्ती पालक, विद्यार्थ्यांना केली जाते. याबाबत ही प्रश्न भाजपचे अमोल जावळे यांनी केला आहे. अशी सक्ती कोणालाही करता येणार नाही अशी तक्रार कोणी केली तर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. तसेच याबाबतची नवीन नियमावली तयार केली जाईल. असे मंत्री दादासाहेब भुसे यांनी सांगितले.

राज्यात अनेक शाळा कनिष्ठ महाविद्यालय खाजगी शिकवणी वर्गाशी करार करून त्याद्वारे मोठी कमाई करत आहेत पूर्वी ज्या अभ्यासक्रमासाठी १५ ते २० हजार रुपये आकारले जायचे ते आता शाळा, कनिष्ठ महाविद्यालय आणि खाजगी शिकवणी केंद्रांच्या संगनमताने २ ते अडीच लाख रुपये एवढी मोठी रक्कम आकारली जात आहे. यावर काय कारवाई करणार याबाबतचा प्रश्न सदस्य हिरामण खोसकर यांनी व्यक्त केला. यावर खाजगी शिकवणी वर्गासाठीची नवीन नियमावली तयार करण्याचे काम सुरू आहे. यासाठी आमदारांनी देखील सूचना कराव्यात असे मंत्री भुसे यांनी सांगितले. नवीन नियमावली लवकरच तयार करण्यात येणार आहे .आमदाराने त्याबाबत काही सूचना असल्यास विभागाला कराव्यात, योग्य सूचना स्वीकारण्यात येतील, असे सांगण्यात आले.




# स्वातंत्र्यानंतर प्रथमच धावणार लालपरी...

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

विंचूर :- निफाड तालुक्यातील सुभाषनगर येथील विद्यार्थी शिक्षणासाठी गावापासून 5 किमी दूर असलेल्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय विंचूर येथे पायी पायपीट करत होते. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांची समस्या दूर करण्यासाठी विद्यालयाकडून सर्वतोपरी प्रयत्न केले गेले. त्याचे फलित म्हणून लासलगाव एसटी डेपोच्या व्यवस्थापिका काळे मॅडम यांच्या सहकार्यातून स्वातंत्र्यानंतर प्रथमच सुभाषनगर येथे एसटी महामंडळाने बस फेरी मंगळवार दि. 15 जुलै 2025 रोजी सुरू केली. त्यामुळे विद्यार्थ्यांची पायपीट थांबणार आहे. त्याप्रसंगी सुभाषनगर गावाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विद्यालयाचे प्राचार्य, विविध पदाधिकारी, ग्रामस्थ व विद्यार्थी बसच्या स्वागतासाठी उपस्थित होते.
बस फेरी सुरू झाल्यामुळे रयत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती, शाळा व्यवस्थापन व विकास समिती, पालक शिक्षक संघ, माता पालक संघाचे सर्व कार्यकारिणी सदस्य, ग्रामस्थ, प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी महामंडळाचे आभार व्यक्त केले.





# दिव्यांग व्यक्तींना धनादेश व गरीब, गरजूंना छत्री वाटप

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून 17 जुलै रोजी दिव्यांग व्यक्तींना धनादेश वाटप आणि गरीब व गरजू नागरिकांना छत्रीचे वाटप करण्यात आले.



ग्रामपंचायत करंजाडे आणि भारतीय जनता पार्टी करंजाडे यांच्यामार्फत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, कर्णा शेलार भाजप अध्यक्ष, सदस्य सुरज शेलार, सुनील भोईर, नंदू भोईर, राजू गायकर, संतोष विचारे, गणेश मोरे, बंटी प्रबळकर, राज इंगळे उपस्थित होते. यावेळी महिला मंडळ, ज्येष्ठ नागरिक याना छत्री वाटप करण्यात आले. करंजाडे येथील पाण्याचा प्रश्न, रस्ता, सीसीटीव्ही यासारखे अनेक प्रश्न मार्गी लागले असून करंजाडे येथे येण्यासाठी नवीन ब्रीजचे काम लवकरच सुरू होणार असल्याचे करंजाडे ग्रामपंचायत सरपंच मंगेश शेलार यांनी सांगितले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# निकृष्ट दर्जाच्या विकासकामांविरोधात जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार -कठोर कारवाई करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार प्रतिनिधी**

तालुक्यातील आर्वी ग्रामपंचायत हद्दीतील स्थानिक ग्रामस्थांनी गावात झालेल्या निकृष्ट दर्जाच्या विकासकामांविरोधात जिल्हाधिकाऱ्यांकडे थेट तक्रार दाखल केली आहे. धनराज सखाराम मळेकर या रहिवाशाने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या लेखी निवेदनात पंचायत समिती अंतर्गत पार पडलेल्या रस्ते, खडीकरण,पेव्हर ब्लॉक बसवणे व ड्रेनेज या सर्व कामांची चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तक्रारीनुसार, २०२३ पासून आर्वी




गावात पांदन रस्त्याचे खडीकरण करण्यात आले आहे. मात्र, योग्य प्रक्रिया न पाळता खडी न टाकता थेट मातीवरच पेव्हर ब्लॉक बसवण्यात आले आहेत. यामुळे ब्लॉक खाली खसून उखडले गेले आहेत. तसेच, पेव्हर ब्लॉकसाठी आवश्यक असलेली पायाभूत कामेही दुर्लक्षित करण्यात आली आहेत. गावात घनकचरा व्यवस्थापनाचे कामही अत्यंत निकृष्ट दर्जाचे केल्याचा आरोप करण्यात आला आहे. केवळ बिले उचलण्यासाठी या कामांची कागदोपत्री पूर्तता करण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संबंधितांनी केलेल्या ड्रेनेजच्या कामाबाबतही गंभीर आरोप करण्यात आला असून, काही ठिकाणी चेंबर आधीच फुटले आहेत आणि ड्रेनेज सुरू होण्यापूर्वीच निकामी झाले आहेत. धनराज मळेकर यांनी आपल्या तक्रारीत जिल्हाधिकाऱ्यांना विनंती केली आहे की, या सर्व कामांची चौकशी करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती नेमावी. जो पर्यंत चौकशी पूर्ण होत नाही तो पर्यंत सदर गुत्तेदारांची बिले अदा करू नयेत.सदर कामाच्या दर्जाची पाहणी करून दोषींवर कारवाई करावी. याप्रकरणात दोषींवर कोणतीही कारवाई झाली नाही तर उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करावी लागेल, असेही त्यांनी म्हटले आहे. या तक्रारीच्या प्रती आयुक्त, महाराष्ट्र रोजगार हमी योजना (नरेगा) नागपूर आणि विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे पाठवण्यात आल्या आहेत. त्यामुळे आर्वी गावातील या कामांच्या चौकशीस वेग येण्याची शक्यता आहे.

## पाटोदा पोलीस प्रशासनाने चिडीमार पथकाची नेमणूक करावी व बस स्थानकात कायमस्वरूपी पोलिस द्या. :- अँड.जब्बार पठाण

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -**



पाटोदा शहरात ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थिनींना पाटोदा शहरात आल्या नंतर व कॉलेज परिसरात रोडरोमियांचा त्रास सहन करावा लागत असून या कडे लक्ष देऊन पाटोदा पोलीस प्रशासनाने पाटोदा बस स्थानक या ठिकाणी कमीत कमी सकाळी ०९:०० ते १०:०० व दुपार नंतर ०३:०० ते ०४:०० वाजता कायम स्वरूपी पोलीसाची नेमणूक करावी अशी मागणी अँड. जब्बार पठाण यांनी केली आहे. या विषयी अधिक माहिती अशी की पाटोदा शहरात ग्रामीण भागातून मुली या शिक्षण घेण्यासाठी सकाळी ०८:०० ते ०९:०० वाजता च्या दरम्यान पाटोदा शहरात येतात. व परत ०३ ते ०४:०० वाजता च्या दरम्यान जातात. या मुलींना बस स्थानक परिसरात रोडरोमीयोचा त्रास सहन करावा लागत असून या कडे तात्काळ लक्ष देऊन पाटोदा पोलीस स्टेशन यांनी बस स्थानक परिसरात सकाळी ०९ ते १०:०० व दुपारी नंतर ०३ ते ०४:०० या दरम्यान पोलीस बंदोबस्त ठेवावा व मुलींना संरक्षण द्यावे. तसेच कॉलेज परिसर व रस्ताने मुलींना कोणी छेडु नये म्हणून शहरात चिडीमार पथकाची नेमणूक करावी अशी मागणी अँड. जब्बार पठाण यांनी केली आहे.

## गाडीत लिफ्ट देऊन प्रवाश्याला मारहाण करून लुबाडणाऱ्या दुकलीला कोकणातून पनवेल शहर पोलिसांनी अटक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

गाडीत लिफ्ट देऊन प्रवाश्याला मारहाण करून लुबाडणाऱ्या दुकलीला पनवेल शहर पोलिसांनी कोकणातून अटक केली आहे.

प्रशांत पाटील या इसमाला आरोपी असदुल्ला उस्मान मिरकर (वय २८ रा. माणगाव), जुबेर मुजावर (वय २५ रा दापोली) यांनी पनवेल बस डेपोच्या बाहेरील रस्त्यामध्ये या इसमाला गाडीत लिफ्ट देण्याच्या बहाण्याने बसवून त्याला नेक्सॉन मॅरेथॉन बिल्डिंग पळस्पे येथे आणून त्याला मारहाण करून त्याच्या कंदील ७ हजार रुपये कितमीचा मोबाईल फोन तसेच त्याच्या गुगल पे वरून ६ हजार १०० रुपये काढून घेतले तसेच त्याच्या कडे असलेली ६०० रुपये रोख रक्कम आणि इतर महत्वाचे कागदपत्र काढून घेऊन त्याला मारहाण आणि धमकी देऊन मुद्देमाल घेऊन ते पसार झाले होते. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रवीण फडतरे, पोहवा अमोल पाटील, पोहवा संदेश म्हात्रे, पोहवा सूर्यकांत कुडावकर, पोना सम्राट डाकी, पोना मिथुन भोसले, पोशी विशाल दुधे आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे या आरोपींचा शोध घेतला असता एक आरोपी चिपळूण परिसरातून तर दुसऱ्या आरोपीला माणगाव परिसातून ताब्यात घेऊन गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत केला आहे.



## श्री कांडकरी विकास मंडळतर्फे विद्यार्थी गुणगौरव सोहळा सन - २०२५ चे रविवारी दादर येथे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यामधील मु. पो. कासार कोळवण गावातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या श्री कांडकरी विकास मंडळ( मावळतीवाडी) तर्फे यांना वाडीतील दहावी- बारावी आणि पदवीधर झालेले विद्यार्थी -विद्यार्थिनी यांचा गुणगौरव सोहळा रविवार दि.२० जुलै २०२५ रोजी दुपारी ठिक-३:३० वाजता दादर येथील २०५, दुसरा मजला,पर्ल सेंटर, सेनापती बापट मार्ग,येवले चहाच्या वर ,दादर ( पश्चिम) मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे.

या मंडळाच्या सर्व ग्रामस्थांनी विशेषतः तरुणांनी मोठया संख्येने उपस्थिती राहुन या कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन अध्यक्ष- श्री. संतोष विठ्ठल करंबेळे,सचिव- श्री.राजाराम रामा रावणंग,खजिनदार-श्री.दिलीप गणपत तोरस्कर आणि विद्यार्थी गुणगौरव सोहळा समिती पदाधिकारी, सदस्य आणि सभासद, महिला कार्यकारणी, युवक कार्यकारणी यांनी केले आहे. या विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यात दहावी(S.S.C ) उत्तीर्ण विद्यार्थी कुमारी.भुमी सुनील करंबेळे -७६टक्के,कुमारी.प्राची प्रविण धावडे -७२.४०टक्के, कुमार.यश अशोक तोरस्कर -७०टक्के,कुमारी.अक्षरा दिपक करंबेळे-६५. २०टक्के, कुमारी.




सेजल सतीश करंबेळे -६३. २०टक्के, कुमारी.तन्वी अनंत करंबेळे-६०. २० टक्के,कु.अनिकेत अनिल धावडे -६३ टक्के, कु.संकेत संतोष धावडे -४६टक्के तर बारावी(HSC) उत्तीर्ण झालेले विद्यार्थी कुमार.नौरंग सचिन करंबेळे ८२. ३३टक्के,कुमार.प्रणव संजय करंबेळे -८२ टक्के,कुमार.शुभम सुनील दळवी -७३. ५०टक्के,कुमार. गौरांग रामचंद्र घाटबाने -६७. ६३टक्के, कुमारी.आर्यनी नरेश तोरस्कर-६५. ८३टक्के, कुमार. प्रणव अनिल धावडे -५३टक्के,कुमारी. जान्हवी प्रकाश सनगले -४६टक्के,कुमार. जय संतोष कंरबेळे -४५टक्के आणि पदवीधर उत्तीर्ण विद्यार्थीमध्ये कु.ओमकार संतोष करंबेळे (B.COM),कु. सौरभ संजय करंबेळेBMS (BACHELOR OF MANAGEMENT STUDIES),कुमारी .हर्षदा किशोर करंबेळे(B.COM)यांचा सत्कार करण्यात येणार आहे. तरी श्री कांडकरी विकास मंडळाच्या गौरवशाली परंपरेतील या वर्षीचा शैक्षणिक कार्यक्रम रविवार, दिनांक २० जुलै २०२५ रोजी दादर येथे संपन्न होणार आहे.आजचा गुणवंत-यशवंत विद्यार्थी उद्याचा कुटुंबाचा आणि समाजाचा भाग्यविधाता आहे.या वर्षीच्या विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यासाठी श्री कांडकरी विकास मंडळाचे पदाधिकारी, सर्व सभासद, सर्व कार्यकर्ते, तरूण वर्ग आणि जेष्ठ - श्रेष्ठ सन्माननीय मान्यवर यांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या या कौतुक सोहळयात आवर्जून उपस्थित राहाणार आहेत. विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या आईवडीलानीही उपस्थित राहून कौतुकात सहभागी व्हावे. कारण मंडळाचा हा कौतुकास्पद शैक्षणिक सोहळा आहे.त्यामुळे मोठया संख्येने उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन मंडळ तर्फे करण्यात आले आहे.

## घरकाम करणाऱ्या नोकराने 42 लाख 60 हजार किमतीचे दागिने पळविले; खारघर पोलिसांनी केली मुद्देमालासह अटक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**



खारघर येथील घरकाम करणाऱ्या नोकराने घरातुन रू. ४२,६०,०००/- किमंतीचे सोन्यावे व चांदीचे व डायंमडचे दागिने, रोख रक्कमेसह पळुन गेलेल्या नोकरास खारघर पोलीस ठाण्याचे पथकाने शिताफिने जालौर, राजस्थान येथुन ताब्यात घेवुन त्याचेकडुन गुन्हयातील १००% मालमत्ता हस्तगत करून गुन्हा उघडकीस आणला आहे. खारघर पोलीस ठाण्यात फिर्यादी यांनी त्यांचे घरात काम करणारा दौलत शैतान सिंग (वय २५) याने त्यांचे घरातील ४२,६०,०००/- रूपये रकमेचे सोन्याचे, चांदीचे दागिने डायमंड व रोख रक्कम अशी चोरी करून पळुन गेल्याबाबत फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला. नमुद दाखल गुन्हयाचे तपासकामी खारघर पोलीस ठाण्याचे वपोनि अजय कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुरज पाटील, (गुन्हे), पोलीस उप निरीक्षक सुरज जाधव, पोहवा सुरेश कासार, पोना मच्छिद्र खेडकर, पोशि अविनाश मोरे, सीडीआर एसडीआर विश्लेषक पोहवा वैभव शिंदे यांचे पथक तयार करून आरोपीचे राहत्या पत्तावर पाठविण्यात आले होते. नमुद पथकाने आरोपीच्या राहत्या पत्तावर सिरोही राजस्थान येथे पाळत ठेवली होती. पंरतु आरोपी हा त्याचे लोकेशन बदलुन वावरत होता. आरोपीचे लोकेशन हे हिमाचल येथे आल्याने त्यास पकडण्याकामी दुसरे पथक रवाना करण्यात आले होते. आरोपीचे लोकेशन जालौर, राजस्थान येथे आल्याने नमुद पथकाने त्यास शिताफिने ताब्यात घेवुन त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबुली दिली असुन गुन्हयातील चोरी केलेला रूपये ४२,६०,०००/- रूपये रकमेचे सोन्याचे, चांदीचे दागिने डायमंड व रोख रक्कम असा मुद्देमालासह त्यास पुढील कारवाईकामी ताब्यात घेण्यात आले आहे.

## कालिकादेवी महाविद्यालयात विविध अभ्यासक्रमांना मान्यता प्राप्त

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर अंतर्गत कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर कासार येथे आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाच्या माध्यमातून विविध स्वयंनिर्वाही अभ्यासक्रम कोर्सला मान्यता देण्यात आलेली आहे. त्यात ड्रेस मेकिंग अँड डिझाईनिंग अभ्यासक्रम, बालवाडी अंगणवाडी प्रमाणपत्र अभ्यासक्रम, ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम, सर्टिफिकेट कोर्स इन कम्युनिटी इंग्लिश अशा विविध अभ्यासक्रमांना विद्यापीठाची मान्यता प्राप्त झालेली आहे. तरी शिरूर पंचक्रोशीतील दहावी पास असणाऱ्या विद्यार्थ्यांनी आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग समन्वयक डॉ. पवार. बी.टी यांच्याशी संपर्क करून आपला प्रवेश निश्चित करावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे यांनी केले आहे.

## हळदीला ड्रायर उपलब्ध करून देण्याची आमदार भावना गवळी यांची मागणी.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**रिसोड:-** गत काही वर्षापासून हळदीला चांगला भाव मिळत असल्यामुळे शेतकरी वर्ग पर्यायी पीक म्हणून हळदी कडे वळताना दिसून येत आहे. बागायती जमीन असणाऱ्या कास्तकारांनी हळद पेरणीला प्राधान्य दिले आहे त्यामधून त्यांना चांगले उत्पादन सुद्धा होत असून आर्थिक सुबत्तता त्यांना खुणावत आहे. मराठवाडा आणि विदर्भ यातील हिंगोली आणि वाशिम जिल्ह्यामध्ये हळदीचे उत्पादन जास्त घेतले जाते त्यामुळे शासनाने हिंगोली जिल्ह्यांमध्ये हळद संशोधन केंद्राला मंजुरी




दिलेली आहे या अनुषंगाने शासनाने हळद संशोधन केंद्राला निधी देऊन कामाला गती द्यावी आणि शेतकऱ्यांना हळद काढणीच्या वेळेत ज्या काही अवकाळी पावसाच्या त्रासामुळे यातना सहन कराव्या लागतात त्याला पर्याय म्हणून ड्रायर सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी विधान परिषदेच्या आमदार भावनाताई गवळी यांनी विधान परिषदेमध्ये करून हळद उत्पादक

आमदार भावनाताई गवळी यांनी विधानसभेत जी मागणी केलेली आहे त्याचा शासनाने विचार करावा त्या माध्यमातून हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या हळद तयार करतानाच्या यातना आणि अनावश्यक खर्च निश्चित कमी होईल. भावनाताई स्वतः एक कृषी कन्या असल्यामुळे त्यांना शेतकऱ्यांच्या कष्टाची जाणीव आहे त्यांनी केलेल्या या मागणीबद्दल आम्ही त्यांचे आभार व्यक्त करतो. बळीराम चोपडे भर जहागीर हळद उत्पादक शेतकरी.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे दिसून आले. हळद काढणीच्या हंगामात अनेक वेळा अवकाळी पाऊस होतो वर्षभर कष्ट करून उत्पादन केलेले पिक हातचे जाते की काय अशी परिस्थिती तयार होते अवकाळी पावसाच्या सरीमुळे हळदीच्या वाळत असलेल्या पिकाला डाग पडतात, त्याची साठवून ठेवण्याची कालमर्यादा कमी होते,त्याला कीड लागण्याची भीती तयार होते.पाऊस येण्याच्या भीतीने अनावश्यक खर्च करावा लागतो,प्लास्टिक खरेदी करावे लागते या सर्व त्रासातून सुटका होण्याकरता नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना पोखरा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना ड्रायरची सुविधा उपलब्ध व्हावी आणि त्या माध्यमातून शेतकऱ्याची हळद त्वरित सुकविण्यासाठी त्याला मदत हवी अशी मागणी आमदार गवळी यांनी विधान परिषदेत लावून धरली. यामुळे हळद उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. पोखरा योजनेच्या अनेक उपक्रमातून शेतकऱ्यांचा फायदा झालेला आहे. आमदार भावना गवळी यांनी वाशिम जिल्ह्यातील पोखरा योजनेमध्ये गावांची व्याप्ती वाढवण्यासाठी पाठपुरावा केला होता. आणि ड्रायर उपलब्ध करून देण्याची त्यांची मागणी जुनीच आहे आज त्यांनी ही मागणी प्रत्यक्ष विधान परिषदेत केल्यामुळे या मागणीची पूर्तता होऊन शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल अशी चर्चा होताना दिसून येत आहे.

# रिसोड तालुक्यातील रिठद ग्रामपंचायत मध्ये नवीन कर्मचारी नियुक्तीची दाद, जिल्हा कार्यालयाने घेतली दखल !

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील.**

रिठद ग्रामपंचायतच्या तुघलकी कारभारामुळे सुशिक्षित बेरोजगार यांना मागील ग्रामसभेमध्ये दिलेल्या आश्वासनाचा ग्रामपंचायत सरपंच, सदस्य व ग्रामपंचायत अधिकारी यांना विसर पडल्याने गावातील सुशिक्षित राहुल कैलास आरु आणि इतर १० सुशिक्षित बेरोजगारांनी व गरजवंत तरुणांनी रिठद ग्रामपंचायतचे अधिकारी, गटविकास अधिकारी रिसोड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांना निवेदनाद्वारे विनंती तथा तक्रार अर्ज सादर करण्यात आला. रिठद ग्रामपंचायत मध्ये रिक्त झालेल्या कर्मचारी यांचे जागेवर किंवा नवीन कर्मचारी सेवक पदांची भरती करणार होते. रिठद गावातील अनेक सुशिक्षित बेरोजगारांनी व गरजवंत तरुणांनी आणी अपंग लोकांनी नोकरी व रोजगार मिळण्यासाठी अर्ज केले होते. त्याबाबद अनेक लोकांना मागील आमसभेत ग्रामपंचायत अधिकारी मोहन भुसारी यांनी शब्द दिला होता की कोणतीही जागा भरताना त्याबाबत जाहिरात काढू व नंतरच कोणतीही भरती करू असे आश्वासन दिल्याने नोकरी मिळण्यासाठी तरुणांनी शांतता ठेवली. अनेक तरुणांनी याबाबत ग्रामपंचायतकडे नोकरी मिळण्यासाठी अर्ज दिले होते तर काही तरुणांचे अर्ज नाकारले होते नाकारण्याचे कारण असे होते की सध्या ग्रामपंचायत मध्ये कोणतीही भरती करायची नाही किंवा जाहिरात काढली नाही त्यामुळे अर्ज स्वीकारण्यास नकार दिला होता.

रिठद गावात नवीन कर्मचारी भरतीच्या चर्चेला उधान, हे सत्य की असत्य याबाबत अनेक तर्कवितर्क सुशिक्षित बेरोजगार चिंताग्रस्त,

रिठद ग्रामपंचायत सरपंच व सर्व सदस्य, आणि ग्राम पंचायत अधिकारी यांनी नवीन कर्मचारी सेवक घेतल्याची गावात चर्चा



होत आहे.याबाबत हे तरुण ग्रामपंचायत मध्ये माहिती घेण्यासाठी सतत दिनांक १४,१५,१६, जुलै २०२५ ला ग्रामपंचायत मध्ये गेले असता ग्रामविकास अधिकारी उपस्थीत नसल्यामुळे माहीती मिळाली नाही,परंतु याबाबतचा ग्रामपंचायत ने ठराव घेतल्याचे त्यांच्या कानी पडले.आणी ती नियुक्ती करण्यासाठी पैसे घेऊन जागा भरल्याची सर्वत्र कुजबूज सुरू झाली. असेही या सुशिक्षित बेरोजगारांनी बोलताना सांगितले. त्यामुळे गरजवंत सुशिक्षित बेरोजगार यांची अशी मागणी आहे की नवीन नियुक्ती करण्यासाठी नियमानुसार पेपरात जाहीरात देणे आवश्यक आहे. व त्याबाबतची गावात दवंडी सुद्धा द्यावी. या नवीन नियुक्ती करीता प्रचार व प्रसार करण्यात यावा व शिक्षणानुसार नियुक्ती करण्यात यावी यासाठी विनंती अर्ज तथा तक्रार दाखल केली आहे. याबाबत गटविकास अधिकाऱ्यांनी याबाबत माहिती घेऊन आपणास सांगतो व असं काही होणार नाही. याबाबत चौकशी करून न्याय दिला जाईल. तर उपमुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भेटी दरम्यान सांगितले की जाहिरात काढण्यासाठी नोटीस बोर्डवर सुरुवातीला माहिती द्यावी लागते. अशी नियुक्ती करता येत नाही. त्याबाबत ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डवर नोटीस लावावी लागते व त्यानंतर जाहिरात दिली जाते .त्या दिलेल्या वेळात अर्ज मागवले जातात व त्यानंतरच याबाबत निर्णय घेतला जातो अशी माहिती प्रत्यक्ष भेटीदरम्यान सुशिक्षित बेरोजगारांना तक्रार अर्ज स्वीकारते वेळी प्रत्यक्ष सांगण्यात आले. त्यामुळे या सुशिक्षित बेरोजगारांना दिलासा देण्याचे काम मुख्य कार्यकारी अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांच्या आश्वासनाने दिलासा मिळाला आहे. त्यामुळे रिठद ग्रामपंचायत काय निर्णय घेते याकडे जनतेचे लक्ष लागले आहे. जोपर्यंत नवीन कर्मचारी भरती संदर्भात जाहिरात काढून कर्मचारी भरती करण्यात येत नाही. तोपर्यंत आम्ही थांबणार नाही. शिक्षणाानुसार न्याय मिळायला हवा असे बोलतांना सुशिक्षित बेरोजगारांनी सांगितले. या निवेदनावर राहुल कैलास आरू, गणेश भगवान आरू, अमोल अशोक आरू, वैभव विठ्ठल आरु, आकाश विठ्ठल बोरकर, अमोल गजानन आरु, अशोक पुंजाजी आरु, शिवाजी कैलास अ आरु, धनंजय सुरेश बोरकर, अर्जुन शिवाजी गवई, गोलू मधुकर आंभोरे, गजानन दिनकर गवई, संदीप भगवान आरु यांच्या निवेदनावर सह्या आहेत. व या अगोदर अनेक सुशिक्षित बेरोजगारांनी ग्रामपंचायत कार्यालय रिठद ग्रामपंचायत कडे अनेक अर्ज आहेत. त्यामध्ये अपंग सुद्धा आहेत. त्या अर्जामध्ये सुद्धा त्यावेळी सुशिक्षित बेरोजगार यांनी ग्रामपंचायत तथापंचायत समितीमध्ये जेव्हा केव्हा नवीन कर्मचारी किंवा सेवक भरती करताना जाहिरात काढावी असेही नमूद केले होते. दिलेल्या निवेदनाचाही विसर रिठद ग्रामपंचायतला पडल्याचे दिसते. असे सुशिक्षित बेरोजगार युवकांनी निवेदन दिल्यानंतर सांगितले.

## निफाड तालुक्यात मोफत कर्करोग तपासणीसाठी ‘कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅन’ दि. २२ जुलैला चांदोरीत उपलब्ध

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**निफाड:-** ग्रामीण भागातील जनतेला दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी आरोग्य विभाग, नाशिक यांच्या माध्यमातून मोफत कर्करोग तपासणी मोहिम राबवली जात आहे. या उपक्रमाअंतर्गत ‘कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅन’ ही मंगळवार दि. २२ जुलै २०२५ रोजी निफाड तालुक्यातील चांदोरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रावर येणार आहे. तरी निफाड तालुक्यातील नागरिकांनी मोफत तपासणीचा फायदा घ्यावा असे आवाहन निफाड तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.सुजित कोशिरे यांनी आवाहन केले आहे.

या व्हॅनद्वारे मुख कर्करोग, स्तनाचा कॅन्सर आणि गर्भाशय मुख कर्करोग यासारख्या गंभीर आजारांची मोफत तपासणी केली जाणार आहे. विशेष म्हणजे, तपासणीत कर्करोगाची लक्षणे आढळून आल्यास संबंधित रुग्णाला पुढील सर्व उपचार पूर्णपणे मोफत मिळणार आहेत. ही महत्त्वाची मोहीम जिल्हाधिकारी जलज शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी अशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली राबवली जात असून, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांच्यासह वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांचे विशेष योगदान लाभणार आहे. तपासणीसाठी आधुनिक वैद्यकीय साधनांनी सुसज्ज असलेल्या या व्हॅनमध्ये दंत तपासणी, स्त्रीरोग तपासणीसाठी स्वतंत्र कक्ष, कोलको स्कोपी, तसेच संशयित रुग्णांसाठी पुढे बायोप्सी करण्याची सोयही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

उपजिल्हा रुग्णालय निफाड व ग्रामीण रुग्णालय लासलगाव यांच्या वतीने निफाड तालुक्यातील सर्व नागरिकांना या मोफत तपासणीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आपली व आपल्या कुटुंबियांची आरोग्य तपासणी करून आरोग्यदूत व्हा असे आवाहनही आरोग्य यंत्रणेकडून करण्यात आले आहे. तपासणीबाबत अधिक माहितीसाठी
प्रशांत ठाकरे, समुपदेशक, ७३५०८०९४४८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# खालापूर तालुका शिक्षण मंडळाचा अनागोंदी कारभार ; साबळे व मसुरकर यांचा पाठपुरावा महत्त्वपूर्ण..

## संस्थाध्यक्षांचा मौन ; पारदर्शक कारभार नसल्याने अनेक अडचणी समोर....

**दैनिक युवक आधार**
**खोपोली, वार्ताहर**

शैक्षणिक संस्थेने भरमसाट व्याजाने घेतले कर्ज संस्था डबघाईस आल्यानंतर एका जिल्हा बँकेकडून कर्ज घेण्यात आले त्याचे भरमसाठ व्याज संस्था नाईलाजाने भरत आहे, परंतु अनेक वर्ष झाले तरी हे कर्ज काही फिटत नाही. त्यातच संचालकातील काही मंडळींनी संस्थेच्या नावावर पैसा गोळा केला, त्याचा हिशोब मागितला जात आहे परंतु त्याबाबतही मौन पाळले जात असल्याचा आरोप ज्येष्ठ संचालकांनी केला आहे. या संस्थेच्या नवीन इमारतीबाबत ठेकेदार आहे तो संचालक मंडळातीलच असल्याचा पण आरोप केला जात आहे. अश्या विविध वादात असलेली रायगड जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रात नावाजलेल्या खालापूर शिक्षण मंडळाचा अनागोंदी कारभार होत असल्याचा आरोप करीत ज्येष्ठ संचालकांनीच संस्थेच्या कारभाराविरोधात दंड थोपटल्यामुळे संस्थेच्या कारभारात सारेच अलबेल नाही, असे दिसून येत आहे. संस्थेतील यशवंत साबळे या संचालकांनी याबाबत अनेकदा लेखी पत्र देऊनही संस्थाध्यक्षांनी याबाबत मौन पाळल्यामुळे संशयाचे ढग अधिक गडद होत चालले आहेत.



तालुक्यातील गरीब शेतकऱ्यांच्या मुलाला शिक्षण घेता यावे यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांनी धान्य, पैसा इत्यादीचा निधी उभारून या संस्थेची उभारणी केली. आज या संस्थेत वेगवेगळ्या विभागात खोपोली खालापूर तसेच बाहेरील हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन भविष्याकडे वाटचाल करीत आहेत.

संस्थेत काही वर्षापासून अनागोंदी कारभाराबाबत संस्था चर्चेत आली आहे.या संस्थेतीलच काही ज्येष्ठ संचालकांनी अनेक आरोप करीत संस्थेकडन विचारणा केली आहे. त्यामुळे दिवसेंदिवस या संस्थेकडे पाहण्याचा दृष्टिकोन पालकांचा व खोपोलिकारांचा वेगळा होत असल्याचे पहावयास मिळत आहे.

ज्येष्ठ उद्योजक यशवंत साबळे यांचा संस्थेत प्रवेश झाल्यानंतर त्यांनी अनेक गोष्टींच्या कारभाराबाबत लक्ष वेधून सुधारण्याबाबत वारंवार सूचना केल्या, मात्र संस्थाचालकांनी त्यांना बाजूला करण्याचा प्रयत्न केला. गेल्या काही महिन्यांपासून संचालकांची पदे बरखास्त केल्यानंतर सर्व कारभार अध्यक्षांच्या हातात आल्यानंतर, कारभार सुधारेल अशी आशा व्यक्त करण्यात येत असतानाच, संस्थेतील एक ज्येष्ठ सदस्य व संस्थेचे माजी अध्यक्ष दत्ताजी मसुरकर यांनी अनेक गोष्टींबाबत आक्षेप घेत अध्यक्षांनाच लेखी पत्र पाठवून अनेक बाबीं बद्दल माहिती मागविली आहे. खालापूर तालुक्यात किमान १५ वर्ष वास्तव्य असणाऱ्यांनाच संस्थेचे सदस्य होता येते असे असतानाहि -तालुक्याबाहेरील नागरिकांना संस्थेचे सदस्य करणेत आले. यालाहि मसूरकर यांनी आक्षेप घेतला आहे. अशा प्रकारचा ठरावच चुकीचा असल्याचे मसूरकर यांचे म्हणणे आहे. यामुळे दत्ताजी मसूरकर यांच्या पत्ररूपी बॉम्बमुळे संस्थेमध्ये खळबळ उडाली आहे.संस्थेतील रोख रकमेचा हिशोब, संस्थेतील सभासदांपैकी पेंटर्स ४१८ व फेलोज मध्ये२६३६ सभासद जाणीवपूर्वक कमी केल्याचे मसूरकर यांनी निदर्शनास आणले आहे. असे करताना चॅरीटी कमिशनरला कळविले आहे का? सभासदांची संख्या कमी करताना कार्यकारणीला विश्वासात का घेतले नाही. असाही सवाल त्यांनी आपल्या पत्रात नमूद केला आहे. यापूर्वीच्या अनेक कार्यकारणी सभेचे इतिवृत्तान्त ज्येष्ठ सदस्य असतानाही आपणास का दिले गेले नाही, असाही त्यांचा प्रश्न आहे.

दरम्यान, संस्थेतीलच कार्यकारणीतील यशवंत साबळे व आता दत्ताजी मसूरकर यांनी संस्थेच्या अध्यक्षांना पत्र लिहून माहिती मागविल्याने संस्थेचे अध्यक्ष काय भूमिका घेतात याकडे खोपोलीकरांचे लक्ष लागले आहे. अनेक वर्ष सर्वसाधारण सभा ही घेण्यात आली नाही, असाही संस्थेचे सभासद असलेले सदस्य आरोप करीत आहेत. संस्थाध्यक्षांनी स्वतःच्या नावावर एक लाख, तांबाटी शाळेच्या नावावर दीड लाख व त्यांच्या वाहनचालकाचे नावावर तेरा लाख घेतल्याची २२-२३ व २४-२५ च्या वार्षिक अहवालात माहिती मिळत असल्याचे यशवंत साबळे यांनी सांगितले. दरम्यान, गेल्या महिन्यात भारतीय जनता पक्षाचे पनवेलचे आमदार पक्षीय कामासाठी खोपोलीत आले असता पत्रकारांनी संस्थेच्या कारभाराबाबत विचारणा केली असता प्रशांत ठाकूर यांनीही संस्था चालकांना कारभार सुधारा अन्यथा नियमानुसार आम्हाला शासनामार्फत पुढील कार्यवाही करावी लागेल, असा इशारा सुद्धा दिला होता. संस्था सध्या अनेक आरोपांच्या चक्रव्यूहात अडकली असून यावर संस्थेचे अध्यक्ष काय भूमिका घेणार याकडे सध्या जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

---

## जि प प्राथमिक शाळा पिलीव यांनी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये भरघोस यशाची परंपरा टिकवली कायम

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर):-**

जि .प .सोलापूर पं .स. माळशिरस अंतर्गत प्राथमिक शाळा पिलीव या शाळेतून चालू वर्षीच्या शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये एकूण १२ विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक झालेने जि प शाळा पिलीव व पिलीव नगरीच्या शिरपेचात सन्मानाचा तुरा खोवुन शाळेची यशाची परंपरा कायम टिकवत यापुढील विद्यार्थ्यांना सुद्धा आदर्श निर्माण केला आहे. यामध्ये अर्णव संभाजी औटी, अतीब अजीब आतार, स्वरा गणेश भंडारे, प्रांजल संजय मदने, कृष्णराज प्रशांत खटावकर, सार्थक लक्ष्मण मेटकरी, प्रशांत देविदास धायगुडे, दर्शन प्रशांत टकले, वेदश्री अगस्ती देशमुख, आयुष आनंद सातपुते, तेजस्विनी सुरज लोखंडे, सोनिया संदीप भंडलकर या विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले असून सदरचा निकाल हा योगायोगाने गुरुपौर्णिमेच्या दिवशी आला त्यामुळे या विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूला गुरुपौर्णिमेची आयुष्यामध्ये स्मरणात राहील अशी गुरुदक्षिणा दिल्याचे बोलले जात आहे. यासाठी केंद्रप्रमुख रा.प्र. फासे, मुख्याध्यापक साळुंखे गुरुजी, मार्गदर्शक शिक्षिका सौ सावित्री फासे, व श्रीमती हेंद्रे मॅडम यांनी मार्गदर्शन केले आहे. तर या यशाबद्दल गट शिक्षणाधिकारी, भाग शिक्षणाधिकारी व अनेक मान्यवरांनी लोकप्रतिनिधींनी म्हणजेच सर्वच घटकातील लोकांनी या यशस्वी विद्यार्थ्यांबरोबरच शाळेचे व मार्गदर्शक शिक्षकांचे सुद्धा अभिनंदन केले. व जिल्हा परिषद शाळा प्राथमिक शाळा आपल्या विद्यार्थ्यांना कोणत्या उंचीवर नेऊन ठेवते याची अनेक उदाहरणं देऊन मग ते नवोदय विद्यालय असेल सैनिक विद्यालय असेल त्याचप्रमाणे आधुनिक युगामध्ये ज्या ज्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये संधी मिळेल अशा ठिकाणी आमचे विद्यार्थी प्रत्येक वर्षी यशस्वीतेचा झेंडा फडकवत आमच्या प्राथमिक शाळेबरोबरच गावाचेही नाव उज्वल करीत असल्याचा अभिमान आम्हाला आहे असे केंद्रप्रमुख रा प्र फासे यांनी अभिमानाने आपली प्रतिक्रिया देताना सांगितले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रत्येक घटकातून कौतुक व अभिनंदन केले जात आहे.




---

## "नवी मुंबई इलेक्ट्रिकल्स कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन" च्या अध्यक्षपदी बाबाजीशेठ आभाळे यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई/ अण्णासाहेब आहेर**

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकलापुर मूळ गावातून १९९१ साली बाबाजी दत्तात्रय आभाळे हे मुंबईत रोजगार निमित्त आले,नोकरी करत इलेक्ट्रिशन क्षेत्रात प्रदीर्घ अनुभव घेऊन श्री दत्तगुरूंवर श्रद्धा,भक्ती व मेहनतीतून "श्री गुरुदत्त इलेक्ट्रिकल्स"व्यवसाय वाढवत स्वतःबरोबर इतरांची ही आर्थिक व व्यावसायिक उंची गाठत यशस्वी भरारी घेतली, व्यावसायिक व सामाजिक मित्रपरिवार जोपासत त्यांनी कर्तुत्वाची उंची निर्माण केली,सदर बाबीची दखल घेत बुधवार दिनांक १६,जुलै,२०२५ रोजी स्थळः गुजरात भवन ३ रा माळा,सेक्टर १५,वाशी







नवी मुंबई येथे वेळ सायंकाळी ७.०० वाजताच्या नवी मुंबई इलेक्ट्रिकल्स कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन च्या चर्चासत्रात अध्यक्षपदी बाबाजीशेठ आभाळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली ग्रामीण भागातून नोकरी व व्यवसाय निमित्त मुंबई,नवीमुंबई व इतर भागातील लोकांची आर्थिक गरजपूर्ती व्हावी व आरोग्यासाठी वेळोवेळी आर्थिक मदत ही श्री दत्त मित्र परिवारातील सदस्यांच्या सहयोगातून करत श्री दत्त मित्र परिवाराचे ते नेहमीच आधारस्तंभ राहिले असून सदस्यांच्या सहयोगातून आर्थिक निधी व आरोग्य निधीतून सदस्यांच्या गरजा पूर्ण करताना पारदर्शक कारभार यामुळे श्री दत्त मित्र परिवाराची आगळीवेगळी ओळख निर्माण करण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे,धार्मिक कार्याबरोबर,सामाजिक कार्यातही त्यांचे वेळोवेळी योगदान असते नवी मुंबई इलेक्ट्रिकल्स कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनच्या कार्यकारणी मंडळ व सदस्यांकडून इलेक्ट्रिकल्स क्षेत्रात पारदर्शकता,एकसंघता आणि व्यावसायिक सहकार्य वाढवण्यासाठी तुमचं नेतृत्व मार्गदर्शक ठरेल असा पूर्ण विश्वास दर्शवत संघटन मजबूत कराल व्यावसायिक एकता नक्की राहील व सगळ्यांना सोबत घेऊन चालण्याचा निर्धार भविष्यात संघटनेची यशस्वी वाटचाल घडवेल अशी अपेक्षा नवी मुंबई इलेक्ट्रिकल्स कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन च्या सदस्यांनी व्यक्त केली व शुभेच्छा देत आभाळे यांचे अभिनंदन केले इलेक्ट्रिकल्स कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनच्या सदस्यांनी ठेवलेला विश्वास सार्थकी लावण्याचा निर्धार बाबाजीशेठ आभाळे यांनी व्यक्त करत असोसिएशनला योग्य दिशा मिळवून देण्याबाबत मानस व्यक्त केला आहे

नवी मुंबई इलेक्ट्रिकल्स कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्या यशस्वी वाटचालीचे कौतुक करत अभिनंदनासह शुभेच्छा देण्यात येत आहेत

---

## शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते स्व. प्रल्हाद पाटील कराड यांचा द्वितीय स्मृतिदिन संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

निफाड येथे शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते स्व. प्रल्हाद पाटील कराड यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त निफाड येथील वैनतेय विद्यालयात आयोजित कार्यक्रमात शेती व आजचे वर्तमान या विषयावर बोलतांना प्रमुख व्याख्याते म्हणून जगताप यांनी वरील प्रतिपादन केले. निफाड सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लक्ष द्यायला कोणी तयार नाही शेतकऱ्यांच्या प्रश्नावर जो कोणी लढा उभा दयायला तयार होईल त्यांच्या पाठीमागे शेतकऱ्यांनी आणि तरुणांनी ताकद द्यायला हवी शेतकऱ्यांच्या मुलांनी शेती बरोबरच उद्योग व्यवसाय उभारले पाहिजे तसेच



शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते स्व.प्रल्हाद पाटील कराड यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना संदीप जगताप ,व्यासपीठावर सोबत वि. दा.व्यवहारे ,रतन पाटील वडघुले, सदाशिव सांगळे ,हिरालाल सानप ,रामनाथ आव्हाड आदी.

शेती करतांना जगात काय चाललं हे सुद्धा सध्याच्या पिढीने समजून घेतलं पाहिजे असे प्रतिपादन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माजी प्रांतिक अध्यक्ष कवी संदीप जगताप यांनी केले या कार्यक्रमाच्याअध्यक्षस्थानी न्या रानडे विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वि.दा.व्यवहारे होते तर प्रमुख अतिथी म्हणून हिरालाल सानप ,सदाशिव सांगळे , रामनाथ आव्हाड आदी मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमाचे स्वागत न्या रानडे विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे सचिव रतन पाटील वडघुले यांनी केले तर प्रास्ताविक न्या रानडे विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे विश्वस्त विश्वास कराड यांनी केले वैनतेय विद्यालयाचे पर्यवेक्षक गुलाब टकले यांनी स्व. प्रल्हाद पाटील कराड यांच्या जीवन कार्यावर आधारित लिहिलेले गीत वैनतेय गितमंचने गायले याप्रसंगी वि .दा. व्यवहारे यांचे भाषण झाले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी विवेक उगलमुगले यांनी तर आभार प्रदर्शन सुधीर कराड यांनी केले एस यु वाघ यांनी पसायदान म्हटले याप्रसंगी संजय होळकर, अँड अंजली उगावकर ,शिवाजी ढेपले, बबन सानप , राजेंद्र राठी ,अँड दिलीप वाघवकर,राजेश सोनी ,मधुकर राऊत, संपत डुंबरे, मुकुंद होळकर , शरद कुटे, कृष्णा आघाव, खंडू बोडके, हरिभाऊ बनकर ,बाळासाहेब सानप, मोतीराम वडघुले ,सुनील वडघुले, अँड अशोक घुगे, कचेश्वर दुसाने, भारती कापसे ,मालती वाघवकर,डॉ सीमा डेर्ले,जानकीराम धारराव ,माधव कुंदे, दिनकर कुयटे, संदीप शिंदे, सुनील जाधव ,दिलीप तासकर ,गोविंद जगताप, रत्नाकर भागवत, कृष्णा नागरे ,चंद्रकांत सांगळे ,दीपक कातकाडे यांच्यासह नागरिक उपस्थित होते

---

## ओरिएंटल कॉलेज ऑफ लॉ सानपाडा येथे आंतरराष्ट्रीय न्याय आणि जागतिक लोकसंख्या दिन साजरा.

**दानक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर उरण रायगड**

"न्याय हा समाजाचा आत्मा आहे, आणि माणसाचा सन्मान हाच न्यायाचा पाया." आंतरराष्ट्रीय न्याय म्हणजे केवळ न्यायालयात निकाल देणे नाही, तर जगभरातील प्रत्येक व्यक्तीच्या हक्कांचे संरक्षण करणे होय. हे न्याय म्हणजे राष्ट्रांमध्ये शांतता राखणे, युद्ध थांबवणे, मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांना आळा घालणे आणि एक सार्वभौम नैतिक अधिष्ठान उभे करणे. तसेच मानवाच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता प्रत्येक वर्षी ११ जुलै रोजी आपण "जागतिक लोकसंख्या दिन" साजरा करतो. या दिवसाचा उद्देश म्हणजे वाढत्या लोकसंख्येची आव्हाने समजावणे आणि त्यावर उपाय शोधणे. या दोन्हीही दिवसाची महत्त्व समजून घेऊन आयक्यूएसी आणि कायदेशीर मदत कक्षाच्या अंतर्गत ओरिएंटल एज्युकेशन




सोसायटीचे ओरिएंटल कॉलेज ऑफ लॉ सानपाडा नवी मुंबई च्या विधी शाखेत 'आंतरराष्ट्रीय न्याय आणि जागतिक लोकसंख्या दिन' १७ जुलै, २०२५ रोजी सकाळी ९:३० ते ११:०० च्या सुमारास साजरे करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आली. सदर कार्यक्रमाच्या प्रसंगी आलेल्या न्यायालयीन प्रक्रियेतील प्रतिष्ठित प्रमुख पाहुण्यांनी विधी शाखेतील विद्यार्थ्यांना भविष्यात न्यायालयीन कार्य करत असताना कशाप्रकारे आपली जबाबदारी आणि कर्तव्य पार पाडावी याविषयी उत्कृष्ट असे मार्गदर्शन केले. भविष्यात कार्य करत असताना गरीब, गरजू, दुर्बल घटकांना न्यायदान प्रक्रियेसाठी सहकार्य करा असे आव्हान विद्यार्थ्यांना कल.या कायक्रमासाठा उपस्थित व्यासपीठावर मान्यवरांमध्ये के.के.घुले बेलापूर दुसरे अतिरिक्त सत्र न्यायाधीश,ओ.ए.साने बेलापूर सत्र न्यायाधीश, बेलापूर पॅनलच्या वकिलांपैकी मदन घरत, बाळकृष्ण भंडारे, हेमांगी पाटील, मनीषा बंडगर ,त्याचबरोबर विधी शाखेचे प्राचार्य गोवर्धन एन देवनानी. डॉ प्रकाश देशमुख , आयक्यूएसी मोहम्मद अश्रफ आणि ऋतुजा चव्हाण तसेच विधी शाखेतील सर्व प्राध्यापक आणि इतर सहकारी वर्ग, आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विधिशाखेच्या विद्यार्थिनी स्वाती मोरे यांनी केले. एकंदरीत विधीशाखेतील विद्यार्थ्यांकरता आजचा कार्यक्रम भविष्यातील त्यांच्या कारकिर्दीसाठी नक्कीच प्रेरणा देणारे ठरेल. असे प्रत्येक विद्यार्थ्यांनी मत व्यक्त केले. सदर कार्यक्रम शिस्तबद्ध आणि उत्साहात साजरा करण्यात आला.

---

## अवैध माती उत्खन्न केल्या प्रकरणी आदिवासी समन्वय समिती रायगड जिल्हाध्यक्ष गणपत वारगडा यांच्या पाठपुराव्याने तहसीलदार अभय चव्हाण यांनी केली बेधडक कारवाई

**दैनिक युवक आधार**
**खालापूर/ प्रतिनिधी :** मौजे रानसई स. नं. ६४/1 या आदिवासी शेतकरी यांच्या वडिलोपार्जित असणाऱ्या जमिनीमधून आरवी लॉजिस्टिक पार्क प्रा. लि. कंपनीने अवैधरित्या माती उत्खन्न केल्या प्रकरणी श्रीम. ताराबाई बारकू कातकरी, श्रीम. शकुंतला रमेश कातकरी, बारकू देहू कातकरी, मारुती बारकू कातकरी यांनी अनेकदा महसूल खात्याकडे तक्रारी दाखल केल्या होत्या. त्यानंतर स्थळ पाहणी करून अवैधरित्या केलेले माती उत्खन्नाचे मोजमाप घेऊन मंडळ अधिकारी वावोशी यांनी तहसीलदार यांना अहवाल सादर केला होता. त्याअनुषंगाने खालापूर तहसीलदार यांनी सुनावणी घेऊन दि. ०६/१२/२०२३ रोजी आदेश दिले आहे. त्यामध्ये १००० ब्रास माती काढण्यासाठी परवानगी घेतली असल्याचे म्हटले आहे तर १२९६.६० ब्रास इतक्या अधिकच्या प्रमाणात माती उत्खन्न झाल्याचे म्हटले आहे. त्यानुसार रक्कम ६०,०६,८२४/- (अक्षरी, साठ लक्ष सहा हजार आठशे चोवीस मात्र) एवढा दंड करून ३० दिवसाचे आत आर.व्ही. लॉजिस्टिक पार्क प्रा. लि. कंपनीने भरणेचा आहे, असे तात्कालीन खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी आदेश दिले होते, परंतु दंड भरला नाही. शासनाचा महसूल बुडविणे, आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनीतून



मातीची चोरी केल्या प्रकरणी आरवी लॉजिस्टिक पार्क प्रा.लि. कंपनीवर गुन्हा दाखल व दंड वसुल करण्यासाठी रायगड आदिवासी समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष गणपत वारगडा, जयवंत शिद, विष्णू खैर, संदीप भस्मा, रोहित वाघमारे यांनी खालापूर तहसीलदार श्री. अभय चव्हाण, महसूल नायब तहसीलदार श्री. पवार यांना निवेदन देऊन चर्चा करण्यात आली होती. त्यानंतर महसूल खात्याने कायदेशीर प्रकिया करून आर.व्ही. लॉजिस्टिक पार्क प्रा.लि. कंपनीला केलेला दंड न भरल्याने कंपनीच्या जमीन मिळकतीचा शोध घेऊन त्यावर बोजा ठेवण्यासाठी वावोशी मंडळ अधिकारी यांना दि. २०/०६/२०२५ रोजी खालापूर तहसीलदार श्री. अभय चव्हाण यांनी पत्र काढले होते. अवैधरित्या व अनधिकृत माती उत्खन्न केल्याने मा. तहसीलदार अभय चव्हाण यांनी काढलेल्या पत्रानुसार तलाठी व मंडळ अधिकारी यांनी आरवी लॉजिस्टिक प्रा. लि. च्या नावे असणाऱ्या सातबाराचा शोध घेतला आणि शासकीय प्रक्रिया करून दिनांक ११/०७/२०२५ रोजी फेरफार क्रमांक १३४८ नुसार आरवी लॉजिस्टिक प्रा. लि. च्या नावे असणारे मौजे रानसई येथील सर्व्हे नं. २०, २६/२, २१/२ असे तिन्ही सातबारावर अनधिकृत गौण खनिज उत्खन्न दंड रक्कम ६०,०६,८२४ एवढा बोजा बसविण्यात आला आहे. खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी केलेल्या बेधडक कारवाईने खालापूर हद्दीतील ग्रामस्थांकडून गुणगान गायले जात आहे. तर आदिवासी शेतकऱ्यांना तहसीलदार अभय चव्हाण यांचे आभार मानले आहे.